म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८०२.
अ. नं. १२३८

bal

REFBK-0005767
REFBK-0005767

नाना रङ्गी निसर्ग मिश्रण

'विश्वा'चें युग्मां आकर्षण !




प्रस्तावना लेखक:—प्र० के० अत्रे, बी. ए. बी. टी. टी. डी. (लंडन).

# कॉलेजचें विश्व

कवि—चं. ग. दीक्षित, पुणें.

किंमत १ रुपया.

[ विजय, पुणें.]

# —कॉलेजचें विश्व—

## विनोदी खण्डकाव्य

[ वृत्त — तुतारी ]

REFBK-0005767
REFBK-0005767

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
ठाणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ........
ठाणें,

[ मुंबईच्या 'वसुन्धरा' साप्ताहिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेलें ]

—कॉलेजच्या रम्य आयुष्यक्रमांतील निरनिराळीं
मनोहर दृश्यें.—

शाखा (स्थळ प्रत)

कवि—चं. ग. दीक्षित, पुणें.

आवृत्ति पहिली

किंमत १ रुपया.

प्रकाशक :
वि. ग. ताम्हणकर,
मॅनेजिंग डायरेक्टर,
महाराष्ट्र पब्लिशिंग हाऊस लि., पुणें.

## — सूचना —

या 'विश्वां'तील व्यक्तींचीं नांवें सर्व काल्पनिक आहेत. त्यांत कोणांस कांहीं अनुलक्षून नाहीं.

'कॉलेजचें विश्व' या खण्डकाव्यांतील एकादा प्रसङ्ग जरी कोणी आत्मसात (?) केल्यास त्यांजवर कोणेंवेळीं काय 'प्रसङ्ग' गुदरेल त्याचा नेम नाहीं !

या खण्डकाव्याचा 'वारसा हक्क' दस्तुरखुद्द कवीकडेच आहे परन्तु प्रस्तुत पहिल्या आवृत्तीचे हक्क तेवढे 'अकरा महिन्यांच्या भाडेचिठ्ठीनें' प्रकाशकांकडे गुन्तले गेले आहेत.

मुद्रक :
धोंडो काशिनाथ फडके,
'विजय' प्रेस, ५७० शनवार पेठ, पुणें २

बाळे

कान्तादेवी !

या तुझ्या प्रेमळ पित्याला

तुझी स्मृति चिरंतन रहावी

या सदिच्छेनेंच माझी

प्रस्तुत पहिली कृति

तुझ्या ठायीं

समर्पण

असो.

# ‘आगामी अपघात !’

प्रस्तुत पहिल्याच पुस्तकानें आपला प्रताप
दाखविल्यास पुढील आगामी पुस्तकाचा
अपघात आपोआपच
टळेल !

पुढील पुस्तक—

## * ‘बाण्डगूळ’ *

[ विडम्बक परन्तु विनोदी स्फुट
कवितांची मोळी ! ]

‘कवीचें छायाचित्र’

मराठी ग्रंथ संग्रहालय.
स्थळ प्रत
सं. नं.
ता.
ठाणें.



# पूर्वरङ्ग !

१ नान्दी ?—

सतत एक वर्षभर मुंबईच्या 'वसुन्धरा' साप्ताहिकांतून क्रमशः प्रसिद्ध होणाऱ्या माझ्या 'कॉलेजचें विश्व' या विनोदी खण्डकाव्याचें रूपान्तर आज एकत्रित अशा पुस्तकरूपांत पाहण्याचें भाग्य मला अगदीं थोड्या अवधींत आणून दिल्याचें श्रेय सर्वस्वीं प्रस्तुत पुस्तकाचे प्रकाशक श्री० वि. ग. ताम्हणकर यांजकडेच आहे.

२ 'प्रकाशकांचा पिनलकोड' ?—

सध्यांच्या 'कवीच्या पडत्या काळांत'सुद्धां श्री० ताम्हणकरांसारखे आपुलकीच्या भावनेनें पुढें सरून हात देणारे भेटल्यामुळें त्यांच्या माझ्यांत एक तऱ्हेचा जिव्हाळा उत्पन्न झाला असल्यांस नवल नाहीं ! 'प्रकाशकांच्या पिनलकोडांतील' कलमें कांहीं औरच असतात असें मी आजपर्यन्त वरवर ऐकत आलों होतों; परंतु श्री० ताम्हणकरांचा एकन्दर सरळ पण सुरळित व्यवहार पाहतां मागील समज गैर होता हें उघडच झालें !

३ पेशवाई पन्थ ?—

कित्येक पेशवाई थाटाच्या मोठाल्या घराण्यांतून, स्वतःच्या मोठेपणाचा इतमाम राखण्यासाठीं स्वतःच्या मुलांचा आपण होऊनच बडेजाव वाढविण्याचा रिवाज अजूनही चालू आहे ! स्वतःचा 'बाळू' बावळट असला तरीसुद्धां खुद्द त्याचे वडीलच त्याला 'बाळासाहेब' म्हणून संबोधतांना आढळून येतात. परन्तु असल्या 'पेशवाई पन्थाचा' नि माझा कांहींच संबंध नसल्यानें प्रस्तुतच्या माझ्या काव्याविषयीं मी आपण होऊन असें आज कोणतेंच 'संबोधन' वापरूं इच्छित नाहीं.

४ वेणीफणी ?'—

पुस्तकरूपांत प्रस्तुतचें खण्डकाव्य प्रसिद्ध करतांना त्यांत बरीचशी 'साफसफाई' केल्याचें पूर्वपरिचित वाचकांना दिसून येईल. केंसांची बट न्

वट साफ विन्चरून, त्यांत कोठें गुन्ता असल्यांस, तो डोळ्यांला पाणी न येईल इतक्या सफाईनें सोडवून वर प्रमाणशीर असा भाङ्ग ठेवल्यावर मगच जसा पिळाचा सुन्दर अम्बाडा स्त्रिया बसवितात व तो बसवितांना त्यांच्या त्या 'वेणीफणींत' पुष्कळदां तासचे तास जरी जातात तरी पण त्यांत जी त्यांची एक विशिष्ठ भावना असते त्याच भावनेला धरून माझ्या काव्याची 'साफसफाई' मी केली आहे असें म्हणणें योग्य ठरेल !

## ५ वृत्तांविषयीं—

प्रस्तुत काव्याचें वृत्त 'तुतारी' या नांवानें रूढ आहे. वृत्तांतील मात्रा अगदीं 'सोळा आणे' मोजून घ्याव्या असा शिरस्ता आहे. या वृत्ताची चाल धांवती असून त्यांत ठसठशीतपणा आणण्याचें काम कवीचें आहे. पांचव्या पंक्तींचा उपयोग 'शेरा मारण्यां'कडे (Strong Remark) करून घेण्यांत कवीचें कौशल्य अवलम्बून असतें. कारण त्यायोगें काव्याला एक प्रकारचा जोर चढतो. आद्य व अन्त्य ओळींचें एक यमक व मधील तीन ओळींचें एक यमक अशा पांच पंक्तींची एक कविता होते. कै० केशवसुतांनीं याच वृत्तांतून आपली 'तुतारी' फुङ्कली, तर कै० गोविन्दाग्रजांनीं आपला 'दसरा' साजरा केला, तर श्री० माधवज्यूलियन् यांनीं आपल्या 'सुधारकांस' सुधारसाची गोडी याच वृत्तांतून दिली आहे. माझा प्रस्तुत प्रयत्न या सर्व पूज्य कविवृन्दांच्या वाचनानेंच प्रगट झाला आहे.

## ६ कवीचें छायाचित्र कशाला ?--

प्रामुख्यानें कवीचा फक्त हृदय व डोकें या दोनच गोष्टींशीं संबंध असल्यानें कवीच्या देहांतील त्या त्या विभागांचा तेवढा फोटो दिला आहे. शीर सलामत ठेवून थोडयाफार धडाला तेवढा फांटा दिल्यांबद्दल वरील समर्थनानें समाधान होण्यासारखें आहे. मारुतीनें आपलें हृदय फाडून दाखविल्याचा दाखला असला तरी तसली 'ट्रिक' फोटोग्राफी माझ्या बाबतींत तसली 'स्टन्ट' करून दाखविण्यास असमर्थ ठरेल ! शिवाय मारुतीचें व कवीचें वांकडें असल्यामुळें तसलें छायाचित्र देणें जमणार नाहीं. कारण एक ब्रह्मचारी तर दुसरा !— 'कृती'कडे पाहिल्यावर कोणास जर 'व्यक्ती'-

कडे पाहण्याची चुकून जरी इच्छा झाल्यांस आपला एक फोटो असूं द्यावा इतकेंच !

७ 'दोन बाबूराव' !—

प्रस्तुत पुस्तकाला अगदीं थोडक्या अवधींत पण सुन्दर अशी प्रस्तावना लिहून दिल्यांबद्दल मी श्री० बाबूराव अत्रे यांचा आभारी आहे. या कामीं श्री० बाबूराव देवभक्त यांनीं मला जी आपुलकीनें मदत केली ती उल्लेखनीय आहे. त्यांचा व श्री० बाबूराव अत्रे यांचा मजवरचा लोभ कांहीं निराळाच आहे आणि या दृष्टीनेंच त्यांनीं ज्या मला सूचना व सुधारणा करावयास सांगितल्या त्यामुळें त्यांनीं मला फारच मोठेपणा दिल्यासारखें झालें आहे. नाहींतर इतक्या आपुलकीनें व आस्थापूर्वक कोण कुणांकडे लक्ष घालतो ? त्यांचें मजवर असलेलें लक्ष असेंच दृढ व्हावें हीच इच्छा असणार ! दुसरें काय !

८ प्रशंसनीय—

माझे परम स्नेही ' वसुन्धरे ' चे सम्पादक श्री. मो. ग. राङ्गणेकर यांचा या ठिकाणीं मोठा गौरवपूर्वक उल्लेख केल्याशिवाय राहवत नाहीं. कारण माझ्यावरील त्यांच्या प्रेमाचें द्योतक म्हणजेच प्रस्तुतचें खण्डकाव्य माझ्या हातून पार पडलें गेलें आहे. तसेंच प्रस्तुत पुस्तकाच्या छपाईत, माण्डणींत, व उठावांत थोडक्या अवधींत आपुलकीच्या भावनेनें अगदीं हात सारून मदत केल्यामुळें विजय प्रेसचे मॅनेजर श्री. ग. गो. दिवाकर यांची ओळख व मेहनत मी कधीं विसरूंच शकणार नाहीं अशी आहे. श्री. ताम्हणकर यांचे बाबतींतही हेंच विधान योग्य ठरेल. थोडक्यांत—

प्रसिद्ध करण्याची जरि घाई !
' पुस्तकां ' वरी तरि घ्या ' रॅपर '
चित्र तीन रङ्गी वर सुन्दर !
झटति ' दिवाकर ' अन् ' ताम्हणकर '
स्वच्छ, सुबक देण्यांस छपाई.

असा त्यांच्याबद्दल काव्यात्मक उल्लेख करून ठेवल्यानें तरी मला त्यांची विस्मृति पडणार नाहीं.

९ आभार—

| कोणाचे ? | कां ? |
|---|---|
| श्री. वेङ्गुर्लेकर | —तीनरंगी चित्र मोठ्या हौसेनें काढून दिलें म्हणून— |
| श्री. शं. न. जोशी. मालक ' चित्रशाळा ' प्रेस पुणें | —' कव्हर ' वरील तीन रङ्गी चित्राची छपाई मोहक पण वेळेवर करून दिली म्हणून— |
| कविमित्र, श्री. शान्ताराम आठवलें, श्री. द. तु. बान्देकर व लेखक, श्री. प. श्री. देशपान्डे व ग. खं. पवार. | —वेळोवेळीं मिळालेल्या प्रोत्साहनाकरितां |

उपरोक्त सर्व कलावन्तांच्या कृपेची, मजकडून कशी काय फेड होईल ती होवो !

१० भरतवाक्य?--

प्रेरणेंतून प्रयत्न आणि प्रयत्नांतून परमेश्वर प्रगट होत असला तरी पण माझ्या बाबतींत परमेश्वरांकडून प्रेरणा व प्रेरणेंतून प्रयत्न प्रगट झाल्याचें प्रस्तुत पुस्तकांवरून दिसून येईल. परमेश्वराच्या पार्श्व प्रेरणेशिवाय मी कांहींच लिहूं शकलों नसतों. असो.

' पूर्वरङ्गाची ' स्थिति ' अहवालाच्या वाचना ' सारखी होऊं नये या भयांस्तव तूर्त येथेंच पुरें !

ता. १ नोव्हेंबर १९३४ गुरुवार
६९० बुधवार पेठ पुणें नं. २ .

सर्वांचा नम्र,
चं. ग. दीक्षित, पुणें.

स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........

# कॉलेजच्या रस्त्यावर——

" बाळपणींचा काळ सुखाचा " अशी बाळपणाची स्तुति करणाऱ्या कवीला तारुण्यांत कॉलेजमध्यें जाण्याच्या अनुभवाचें सुख माहीत नसावें असें वाटतें. बालपणीचें सुख भोंवतालच्या जगासंबंधींच्या असलेल्या अज्ञानावर अवलंबून असतें तर तारुण्यांतील सुख त्या जगाच्या सौंदर्याची जाणीव झाल्यामुळें निर्माण होतें. " शाळेसी जातांना " वाटेंतील दरोबस्त " तमाशे " पहात शक्य तितकें रेंगाळत जाणारे बालबच्चे आणि कॉलेजाच्या प्राकारांत वर्ग संपला तरी विनाकारण घोटाळणारे तरुण या दोघांच्या मनोवृत्तींतला फरक लक्षांत घेतला असतां वरील विधानाचा अर्थ लक्षांत येईल.

तारुण्य हा आयुष्यांतला अत्यंत सुखाचा काल आहे असें एकादा म्हातारादेखील कबूल करील. हा तारुण्याचा काल एकाद्या कॉलेजमध्यें घालविण्याची संधीं मिळणें हा सुखाचा परमोत्कर्ष होय. बाल्याची मर्यादा नुकतीच कुठें संपलेली आहे, जगांतील नाविन्याच्या दर्शनानें दिपलेली दृष्टि त्यांतील सौंदर्यशोधासाठीं कुठें स्थिरावलेली आहे, वडीलधाऱ्या मंडळींच्या फाजील शिस्तीमुळें होणारा कोंडमारा थोडा कुठें ओसरत आहे, अंतःकरणांत यौवनोभव विचाराच्या आणि भावनेच्या आंबरांयां कोठें मोहरू लागल्या आहेत, प्रणयाच्या कोकिळेचा पहिलाच सुरेल टहुकार कानांवर कुठे पडूं लागलेला आहे, अशा आयुष्याच्या मनोहर अवस्थेमध्यें महाविद्यालयाच्या उंबरठ्यावर पाऊल टाकतांच आंतून येणाऱ्या स्वातंत्र्याच्या मैलागिरीवाऱ्याचा झोत तरुणांच्या मनाला मोहिनी घालतो. चोरांच्या गुहेतील संपत्ती पाहून भांबावणाऱ्या अलीबाबाप्रमाणें

महाविद्यालयाच्या प्राकारांत इतस्ततः पसरलेल्या अनुभवाच्या राशीच्या राशी पाहून तरुणांच्या चित्तवृत्ती स्तंभित होतात म्हणूनच महाविद्यालयांत घालविलेला चार वर्षांचा मनोहर काळ हा एकाद्या सुखमय स्वप्नाप्रमाणें तरुणाला वाटत असतो. नापास होणाऱ्या विद्यार्थ्यालादेखील या काळाची दीर्घता या अद्भुत रम्यतेमुळेंच जाणवत नाहीं. याच सुखानुभूतींमधून " कॉलेजचें विश्व " या प्रस्तुत काव्याचा जन्म झालेला आहे.

मयासुरानें निर्माण केलेल्या सृष्टीप्रमाणें महाविद्यालयीन सृष्टी ही सर्वांग-सुंदर आहे. तुमच्या आमच्या संसारी जगांतील संकटें, दुःखें, स्वार्थ-साधनाच्या धडपडी व निराशेचे जळफळाट या सृष्टीमध्यें असूंच शकत नाहींत. कधीं चुकून एखादें अभ्र ह्या सृष्टींतील आकाशांत उद्भवलें तरी त्यांतून विजेच्या कडकडाटाऐवजीं वसंतकालीन पर्जन्याच्या रुपेरी सरीचाच शिडकावा सांडावयाचा. अशा या स्वप्नमय सृष्टींतील निरनिराळ्या अनु-भवांचीं मनोहर रेखाचित्रें रेखाटण्याचा प्रयत्न या काव्यांत केला आहे. प्रस्तुत काव्य हें आकारामुळें खुद्द कवींना जरी खंडकाव्याप्रमाणें वाटत असलें तरी त्यांमध्यें खंडकाव्याला अवश्य असणारा एकसूत्री अखंड कथा-भाग नाहीं; हा या काव्याचा दोष नसून तें त्याचें एक मनोहर वैशिष्ट्यच आहे असें मला वाटतें. हें काव्य वाचतांना महाविद्यालयीन व्यक्तींचीं आणि अनुभवांचीं विनोदी शब्दचित्रें इतकीं झपाट्यानें डोळ्यांपुढून धांवत जातात कीं, आपण एकादा चालताबोलता व्यंग चित्रपटच प्रत्यक्ष पाहतों आहों कीं काय असें वाटतें.

सामान्य पदवीधरांजवळ कॉलेज सोडल्यानंतर स्वतःच्या पदवीशिवाय त्या कॉलेजच्या आठवणींची कांहींच खूण उरत नाहीं, म्हणून आपल्या स्मृतिमंजुषेंत आपले स्वतःचे कॉलेजचे अनुभव इतक्या ताजेपणानें आणि जपणुकीनें राखून ठेवल्यांबद्दल खुद्द कवीच्या सूक्ष्म स्मरणशक्तीचें कौतुकच करावेंसें वाटतें. महाविद्यालयीन आयुष्याला दुरावलेल्या माझ्या-

सारख्या मध्यमवयीन पदवीधराला फिरून त्या सुखाच्या सृष्टींत नेऊन सोडण्याचें श्रेय हें काव्य लिहून कवीनें मिळविलेलें आहे ही या काव्याची अपूर्वता आहे असें मला वाटतें.

त्याबरोबर दुसराही विचार मनांत येतो; मला स्वतःला कॉलेज सोडून सुमारें १५ वर्षे होत आलीं. या पंधरा वर्षांच्या काळांत बाहेरच्या व्यावहारिक विश्वाप्रमाणें कॉलेजच्या विश्वांतही आमूलाग्र क्रांती घडून आलेली आहे. या क्रांतीकडे डोळेझांक करणाऱ्या दृष्टीला या 'विश्वांतील' सर्वच गोष्टी अपरिचित वाटल्याशिवाय रहाणार नाहींत. नवीन प्रचार, नवीन पद्धती, नवीन नवीन संकेत आणि नवीन भाषाप्रयोग इत्यादि वैशिष्ट्यामुळें पूर्वींचें कॉलेजचें विश्व हेंहि बदलून गेलें आहे कीं काय असा क्षणभर भास होतो.

आमच्या काळीं "आहे ब्बुवा" चा ध्वनी वर्गांतून ऐकूं येत नसें. खडू किंवा कागदी बाण मारणारे धनुर्धारी वीरही आमचे वेळीं नव्हते. पोलो कॉलरचे क्रेप शर्ट्स् किंवा हिरवे रंगाचे दु-पोटी ब्लेझर किंवा सैल पांढरे चोळणे असले वेषभूषेचे प्रकारही आमचे वेळीं नव्हतें. महायुद्धाच्या भयांमुळें "यू. टी. सी" चा 'युनिफॉर्म' घालुन हिंडणारी विलायती साहेबांची एतद्देशीय विडंबनेंहि आम्हांला त्यावेळीं पहावयांस मिळत नसत. "खुदानूर" 'दोराबजी,' किंवा "कॅफे यूनिक" हीं दुकानेंही आमच्या सृष्टींत त्यावेळीं नव्हतीं. त्यावेळीं धूम्रपानाचे षोकी विद्यार्थी नव्हते असें नाहीं. तथापि "पिवळ्या हत्तीचा" प्रसार आजच्याइतका त्याकाळीं नव्हता. विद्यार्थ्यांच्या जीवनक्रमांत 'ग्रीटा गार्बो', 'दुर्गा खोटे' ह्या सिनेमानटींनींहि प्रवेश त्यावेळीं केलेला नव्हता. "समाजस्वास्थ्या" सारख्या मासिकाचा अभाव त्यावेळचें विद्यार्थी "आतंकनिग्रह गोळ्या"च्या जाहिराती वाचून भागवीत असत. त्यावेळीं विद्यार्थिनीप्रमाणेंच त्यांच्यासाठीं उल्लू बनलेल्या प्रेमी पागलांची संख्याही कमी होती. समाजाची घटना किती झपाट्यानें बदलते आहे, हें या 'विश्वांत' वर्णन केलेल्या गोष्टींवरून

माझ्यासारख्या जुन्यापुराण्या कॉलेजांतील विद्यार्थ्याला दिसून येईल. या काव्याच्या वाचनाचा दुसरा इष्ट परिणाम असा होईल कीं, कॉलेजमधील स्वतंत्र वातावरणांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या खुल्या आयुष्यक्रमांच्या पद्धती पाहून पुष्कळ वेळां कोत्या दृष्टीनें त्यांच्याकडे बघणाऱ्या जुन्यापुराण्या मंडळींचा त्यांच्यासंबंधीं गैरसमज होत असतो. नवीन सुधारणेबरोबर जीवनाच्या ज्या कांहीं विशिष्ठ पद्धती समाजांत रूढ होत आहेत त्यांबद्दल असंतोषाची वृत्ती दाखवण्यापेक्षां समाजाच्या भावी हिताच्या दृष्टीनें त्यांच्या आवश्यकतेकडे बघण्याची ह्या मंडळींनीं संवय करून घ्यावयास पाहिजे. त्याप्रमाणेंच पुष्कळ वेळां कॉलेजमधील तरुणांचे विशिष्ठ विचार, त्यांच्या भावना व दुर्दमनीय आकांक्षा यांचें यथार्थ आकलन न झाल्यामुळें त्यांच्यावर शिस्त राखतांना त्यांना विरोध दाखविण्याची वृत्ती कॉलेजांतील अध्यापक मंडळींची दिसून येते. आजकाल कॉलेजांतील शिस्तीचा बोजवारा झालेला कुठेंकुठें आढळून येतो; त्याच्या मुळाशीं तरुण विद्यार्थ्यांच्या मनोरचनेचें व जीवनक्रमाचे अध्यापकांना असलेलें अज्ञान हें आहे असें मला वाटतें. सदर काव्य वाचण्याइतकी फुरसत आणि अनुकूल मनःस्थिति जर या वेदाभ्यासजड प्राध्यापकांना मिळेल तर त्यांना पुष्कळच फलप्राप्ती होईल यांत शंका नाहीं.

सदर काव्यांतील रचनेचा अस्खलित ओघ, रेखीव शब्दांत चितारलेलीं व्यक्तींचीं व प्रसंगांचीं ठळक वर्णनें, व आरंभापासून ते अखेरपर्यंत इतस्ततः पसरलेल्या विनोदाच्या हृदयंगम छटा यामुळें या काव्याला एक प्रकारचें वैशिष्ठ्य प्राप्त झालेलें आहे. क्वचित् कोठें शृंगारिक गोष्टींच्या मनमोकळ्या वर्णनांत तारुण्यसहज खळाळीमुळें शब्दरचनेंत कवींच्या हातून मर्यादाभंग झाला असल्यांस तो तितका रसिकांना असह्य होईल असें वाटत नाहीं. शब्दचित्रें रंगविण्यांत दिसून येणारें कवीचें कौशल्य वाखाणण्यांसारखें आहे. " गुलकंदाची भरली बरणी " " बदामबीची सोलिव

कांती," किंवा "कोंकणांतले काजूचें फळ। झाडावरचें पिकलें पोफळ। मादक होती जणूं जायफळ" आणि "तळणीनें ये तांबुस लाली। फुगिर पुरीसम गोऱ्या गालीं। श्रीखंडाचीं डाव ओतली" हीं सौंदर्याची वर्णनें मार्मिक व मनोहर आहेत. "भंवतीं वाहे मोकळी हवा। गोकर्णाच्या वेलींचे पण। कुंपणांवरी बसले वेष्टण। मधें स्वच्छ वालुका-पटांगण। बाजूला वाहतो कालवा"—हें विद्यार्थिनींच्या वसतिगृहाचें वर्णन किंवा भोंवताली हिरवी आंबराई असलेल्या टेकाडाचें आणि हिरवी छाटी नेसून बसलेल्या एकाद्या मौलवीचें कवीनें दाखविलेलें साम्य हें त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणाचें निदर्शक आहे. अशा तऱ्हेनें आमूलाग्र नवीन पद्धतीचें हें काव्य लिहून कवीनें मराठी काव्य-वाङ्मयांत वैचित्र्याबरोबर एक मोलाची भर घातलेली आहे यांबद्दल कोणीही कवीचे अभिनंदनच करील.

लोण्याचा शुभ्रपणा तुपांत ज्याप्रमाणें उतरत नाहीं त्याप्रमाणें काव्याचे सर्व सद्गुण आपल्या पहिल्या काव्यकृतींत उतरले नसतील याची जाणीव खुद्द कवींना आहे, हें जसें त्यांच्या विनयाचें द्योतक आहे त्याप्रमाणेंच ही भावना त्यांच्या काव्यशक्तीच्या उत्तरोत्तर होणाऱ्या प्रगतीसही आवश्यकच आहे. प्रस्तुत काव्यासारखे "गोड अपघात" जर कवी मराठी वाङ्मयांत पदोपदीं करणार असतील तर त्याला घाबरण्याचें कोणाही रसिक पथिकांस कारण नाहीं. या पेक्षां अधिक सांगण्यासारखे तें काय असणार !

प्रल्हाद केशव अत्रे.

—

मराठी ग्रंथ संग्रहालय.
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
ठाणें.

पुस्तक वाचून मनांस जे वाटेल
ते लिहिण्यांसाठीं या पानाचा
उपयोग करा—

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ......... नं. .........
ता. .........
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे.

# " कॉलेजचे विश्व "

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं.......... नं..........
ता..............
ठाणें.
मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.........
ठाणें,

## उद्घाटन समारंभ !'

साहित्यक्षेत्रांत शिरस्ता !
‘ सरस्वतीची ’ बघुन छावणीं
जुजबीं करणें तेथ चांचणी
खुलीं करुनिया ‘ लिखाण-गोणीं ’
तोही मज पण बन्दच रस्ता !

मराठी ग्रंथ संग्रह
स्थळ प्रत
ठाणे.
मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६०२५
ठाणे,

नगरां बाहेरील हवेवर
साफ पटाङ्गणि विराजलेलें
भंवती बगिचा घे आन्दोले
वारे वाहे टेकडिवरले
स्वतंत्रतेंत स्वतंत्र विचार १

अशा ठिकाणीं ज्ञान खेळतें
स्वतंत्र बाणा, वृत्ति बदलते
प्रेमाची मग ओळख पटते
ऐक्याचें संवर्धन घडतें
विद्यालय ते नांवच मोठे !

वाहत नेतो वास वायु तो
षोकि जनांना घे आकर्षुनि
वेड लावुनी जाई निघुनी
मात्र स्मृति जन्माची ठेवुनि
हृदयाची मालकी मिळवितो ३

हांसत बोलत मन्द चालतो
कुन्दकळ्यांचा नाजुक तान्डा
पातळांवरी फुलॅ तेरडा
युवक बाजुला घोळति गोन्डा
कुणां तरी तो हळुंच खुणवितो ४

हुषार मुलगी, नांव घुमघुमे
विद्यार्थिनि ती मन्दाराणी
गुलकन्दाची भरली बरणी
गोड तिची ती वीणावाणी
ऐकुनिया कॉलेज बहु रमे ५

चुकुन कधीं ती मन्दाराणी
फेंकुन जातां नजर गहीरी
मोहळांतली अधर माधुरी
गोडांबीची लज्जत न्यारी
वदे हळुंच कुणि, 'ती बघ राणी' ६

रसिकांनीं तिज असें वर्णिलें,
बदामबीची सोलिव कान्ती
तिच्या उमटली होती दन्तीं
दे शोभा ती अधरप्रान्तीं
मुखांत मोतीचूर आढळे ७

भुवयां काळया धनुष्याकृती
मादक मोहक प्रीतिविवशाविष
गळांस पडतां देखुन आमिष
नयनसायकीं चढवुनि पीयुष
जखम जिव्हारीं होत गोड स्मृति ८

दाठर अधरीं मदन विहरतो
खेळ खेळुनी दावि कौतुकां
चाफेकळि जणुं सरळ नासिका
दवबिन्दूचें चमकें तेज कां !
गोल वदनिं तर चन्द्र प्रगटतो ९

दिसतां राणी ये 'क्लासाला'
'आहेऽब्बुवा 'चा ध्वनी गर्जला
'रोमँटिक' तरि लाजलि बाला
येउनि बसली जैशी चपला
राजा भावें, 'चियर् अप्,' वदला १०

टिङ्गल करणें ज्यांचा धंदा
पैकिं अशांचा मार्गें भरणा
कोंपऱ्यांतुनी घेती ताना
उशिरां येतां उठे घोषणा
' आहे व्युवा ' नी करणें निन्दा ११

राजा भावे त्यांतिल व्यक्ती
कॉलेजांतिल पहिलें वहिलें
चार पावसाळे जरि गेले
अजुनी नव्हतें वर्ष उलटलें
ही तर त्याची ' दिगन्त कीर्ती ? ' १२

राजा नव्हता चलाख मोठा
परी तयाला दिमाख खोटा
कारण त्याचा विचार कोता
दोस्तांजवळीं चहा मागतां
सदासर्वदा बाष्कळ बाता ! १३

राजा होता वर्गपुढारी !
नेम धरूनीं खडू मारणें
बाण कागदी अचुक फेंकणें
' स्नॅप ' कुणां ना कळत काढणें
वर्गामध्यें हीच कामगिरी ! १४

' लेक्चर ' सुटतां सर्वाआधीं
गर्दीची तर सन्धी साधुनि
' सॉरी ' वदणें धक्का देउनि
विद्यार्थिनिचे नांव घेउनी
राजा त्यांशीं ओळख बान्धी ! १५

कॉलेजांतिल प्रत्येकाची
मिजास करण्याकडेंच वृत्ती
त्याला शोभुन त्याची ऐटी
करि बाल्यामृत आम्बट खाटी
कारण धुन्दी तारुण्याची १६

राजाचा तर थाटमाट किति ?
' क्रेप ' शर्ट ज्यां ' पोलो कॉलर '
कोटासाठीं हिरवा ' ब्लेजर '
भाङ्ग वळवुनी मागें ' रादर '
' यू. टी. सी. ' तिल काठी हातीं १७

धोतर अगदीं तलम मलमली
जाळिदार जणुं मच्छरदाणी
काचा त्याचा नीट कसूनी
मोरपिसारा मागें ठेवुनि
चाले जैसा ' बैल-पखाली ' १८

आपण म्हणजे मदन दिसावें,
रोज चारदां दाढि घोटणें
मेणबत्तिचीं झांक आणणें
वरतीं ' स्नो ' चा मारा करणें
नित्यक्रम हा त्यां न चुकावें ! १९

जरी चालली कडे कडेनी
जावें घेउन ' गाडी ' जवळुनि
अशा उपायें लक्ष वेधुनी
सौन्दर्याची करा पाहणी
राजाची ही विचारसरणी ! २०

एकीवरती नाहीं दृष्टी
मन्दाराणी, ‘ आली कां ती ? ’
चम्पा मोने, ‘ पहा पहा ती ’
एकामेकां प्रश्न करीती
राजा आणिक वर्गसोबती ! २१

समोर पुस्तक उगाच धरिती
अभ्यासाचा करुनी ‘ बाऊ ’
वरपाङ्गी सोवळें दिखाऊ
वरुनी नातें बहीणभाऊ
विद्यार्थी किति असले असती २२

त्यांतच अमुचा राजा होता
अशा युक्तिच्या जनकत्वाचा
मान तयाला असावयाचा
प्रत्येकीच्या खाचाखोंचा
हेरण्यांत तो हुषार मोठा ! २३

डाव्या बाजुस चम्पा मोने
उजव्या बाजुस मन्दाराणी
राजकुंवर दोघींत ‘ तन्मणी ’
कधीं जिची घे नजर रोखुनी
पहिल्या बाकांवरचा सोने २४

उदेपूरच्या सर्दाराची
राजकुंवर ही बेटी होती
पुण्यांस आली विद्येसाठीं
कपडालत्ता कांहि न कमती
कारण होती धनाढ्य घरची २५

राजकुंवर जैं गालीं हंसते
तारुण्याची त्रिपुरि पौर्णिमा
बाकांवरती मोहक प्रतिमा
' जस्वन्दीचा ' ज्यांत रक्तिमा
जिलबी पाकांतील वाटते ! २६

भुंवया दोन्ही धनुष्यांकृती
मधें नासिका सरळ तीर जणुं
सज्ज कुणांस्तव असेल हे धनु ?
प्रवाळरङ्गी चिंचोळी हनु
सौंदर्याची जिवन्त शक्ती ! २७

' डोलकाठि ' सम जींत झुले तनु
अंगलटी अशि नाजुक नव्हती
कारण रजूपूताची बेटी
जिथें तिथें ती दाठर होती
डिङ्गरिची भर्दार शेंग जणुं ! २८

शोभत होता अंगलटीनें
तंग पोलका किन्खापीचा
दावी आंतिल भाग छातिचा
गौरगळ्यांतिल सर मोत्याचा
खालींवरतीं हों श्वासानें २९

कॉलेजांतिल वीर शिकारी
' नागवेल ' तिज संज्ञा देती
' कणिस केवड्याचेंही ' वदती
' क्लारा बो ' कुणि उपमा देती
' सुलोचना ' कुणि वदे ' माधुरी ' ! ३०

सामन्तांसम विचित्र व्यक्ती,
संस्कृत भाषेचे अध्यापक
ज्ञानानें जरि फारच व्यापक
विद्यार्थ्यांना साधें सूचक
शिकविण्यांत हातोटी नव्हती ३१

परिटघडीचा साधा कोशा
धोतर म्हणजे निव्वळ पन्चा
कसलेला तर काचा त्याचा
गुडघ्यांवरती असावयाचा
जुनापुराणा अस्सल पेशा ! ३२

विद्यार्थ्यांनीं कमिटि नेमिली
सामन्तांच्या कोटांवरती
' ठिगळ्यांचा कशिदा ज्याअर्थी–'
संशोधक ते निकाल देती
शिवला तो ' सत्तावन सालीं !' ३३

डोळ्यांचे ते द्रोण शोभती
गालांच्या तर कोनाड्याला
कुंदकळ्या दातांच्या झाल्या
बुन्दीच्या जणुं कळ्याच पिवळ्या
कारण तंबाखूची ' चिमटी ' ३४

शिकवाया जैं उभे राहती
झळुकीसरशी झुलते यष्टी
असावयाचे बहुधा कष्टी
बोजड शब्दांची बहु वृष्टी
विद्यार्थी बाकांत झोंपती ३५

अशासारखी सुवर्णसंधी
साधाया ते कधीं न चुकती
चष्म्यांतुन किलकिलें पाहती
बाजूला वेळून मान ती
बांकावरले ' पेढे कन्दी ' ? ३६

जगांत चाले जी हाकाटी
साठीमध्यें बुद्धी नाठी
कपाळांवरी काढिति आठी
नीति तयांची असते खोटी
अशांत सामन्तांची गणती ! ३७

सरळ गांठणें ध्येय सोडुनी
धरण पाहतां नदी थबकली
पाण्याची त्यांतील पातळी
आपणहोउन ऐशावेळीं
वळण वांकडें घेत लावुनी ३८

अध्यापक जर ' इकडे तिकडे '
' काणा डोळा ' करूं लागले
शिस्तीला सोडून वागले
पोरांना मग बंधन कसलें ?
कारण मिळती ' धडे वांकडे ' ! ३९

सामंतांचे ' शाकाहारी '
खाणें असलें तरी शरीरीं
असे वृत्ति बाणलीं ' शिकारी '
गोकुळांतले होत मुरारी
जुनाट ' मोरावळा ' पुणेरी ! ४०

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ग्रंथ नं.
ठाणें.

कधीं होउनी मोह अनावर
'खुदानूर' वा 'दोराब्जीला'
भेट द्यावया जाणें ज्याला
नऊ वाजतां रात्रीं त्याला
'रेसीडेन्सी' ना पथ्यावर ४१

साक्षात् वाटुनि जुलूम 'रेक्टर'
खोलीमध्यें स्वतन्त्र ज्याला
रहावयाचें असेल त्याला
'पिवळा हत्ती' ओढायाला
'रेसीडेन्सी' ना पथ्यावर ४२

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे.

'हॉबी' जडुनी चैनीखातर
शक्तीसाठीं अण्डें खाणें
मुंज्यांच्या पक्षाला मिळणें!
नित्य सकाळीं रतिब लावणें
पडतें 'खोली'वर 'सोइस्कर' ४३

'शो' 'आर्यन्' वा 'श्रीकृष्णाला'
'सिर्टीत' जाउनि पहावयाला
रात्रीं नाटक वा जल्शाला
बन्धन नसतें कधीं कशाला!
'खोली' असते याच सुखाला! ४४

कुठें कुणाची नसते बन्दी
अशा ठिकाणीं विद्यार्थिनिला
बोलावुनि घेतांच चहाला
उलट तिच्या हातचा पिण्याला,
मिळते खोलीवरती सन्धी ४५

कॉलेजांबाहेर राहुनी
'तास'बुडवुनी घेतां येतें
झोंप दुपारीं, नन्तर पत्ते
चैन कराया जेथें मिळते
खोली युक्तच अशा बाजुंनीं! ४६

खोली घेउन रहावयाची
येते ज्यांच्या मनीं कल्पना
घातुक सवयीं जडती त्यांना
युवती दिसतां वेळित माना
वृत्ती असते लेचीपेची! ४७

आङ्ग्ल स्त्रीचीं मुग्ध मनोहर
चित्रें लावुनि पहात बसती
'पॅरिस' मधली मधून 'ब्युटी'
किंवा एकादी 'ओलेती'
तारुण्यांतिल मोह अनावर! ४८

अर्धनग्न जी तनु शेलाटी
तारुण्याचा फुटुनी मोहर
पाडाचें फळ पीनपयोधर
अधरांवरती साजुक धीवर
वर्णन असलें 'हवापालटी'--! ४९

--वाचायाची चटक लागली
त्यांना 'बायरन्' अप्रिय कुठला?
दिसून येते अशा दृष्टिला
शब्दमाधुरी पदापदाला
'प्रभाकरा'च्या लावणींतली! ५०

कॉलेजांतिल उल्लू दुक्कल
खोलीमध्यें राजा भावे
आणि सोबती सोनू कवें
निम्मे भाडें खर्च करावें
घरीं मागुनी पैसे तब्बल ! ५१

खोलीवरती 'डबा' आणुनी
दोन वेळचें करिती जेवण
प्रत्येकीं नउ रुपये देउन
घरीं मागती अठरा कारण
खर्च 'खाजगी' करणें चैनी ! ५२

रविवारीं मागतां सोबती
'फिस्ट' कुणाला नको द्यायला
रुपया रहावा तसाच अपुला
या दृष्टीनें खाणावळिला
'रजा' देउनी 'डबा' आणिती ! ५३

'खाडे' करुनी अधुनीमधुनीं
नव्या पुस्तकां रक्कम मागुन
जुनीं पुस्तकें घाउक देउन
दोहींमध्यें निघे 'कमीशन'
त्यांत पडे भर धरुनि 'शिकवणी' ५४

अशातऱ्हेनें महिन्याकाठीं
राजा सोनू जरी जमविती
'गंगाजळि' हो तरी पालथी
पहिल्या पंध्रवड्याला भरती
दुसऱ्याला लागते ओहटी ५५

‘ तास ’ चुकवुनी वेळ काढणें
म्हणजे ‘ रेस्टारंट ’ पहाणें
‘ पिवळा हत्ती ’ स्वस्त फुंकणें
चावट चर्चा सर्व बाजुनें
करून पैसे रोज खर्चणें ५६

‘ सिटींत ’ जेव्हां फेरी होणें
‘ कन्सेशन् ’ घे ‘ स्टूडंट् ’ म्हणुनी
दरांत निम्म्या खेळ पाहुनी
शनिवारीं कधिं साधुन ‘ मॅटिनि ’
उत्तम उत्तम ‘ शो ’ न सोडणें ! ५७

तोंड हलविण्यां ‘ शो ’ बघतांना
शेंगा अथवा लेमन घेणें
‘ चॉकोलेट्च्या ’ वड्या चघळणें
‘ कॉलेजीस्टूडंट ’ मिरविणें
हीच यांतली असे भावना ५८

कशांस फेरी ‘ कँपा ’ मधली ?
‘ झेन्डूच्या ’ कीं ‘ फुलां ’ मधूनी
‘ काव्यफूल ’ ‘ श्यामले ’–हुंगुनी
‘ अभक्ष्य ’ भक्षण ‘ खिमा ’ ‘ बिऱ्यानी ’
खाण्याची त्यां चटक लागली ५९

उरली ‘ गंगाजळी ’ उडविती
सिनेमानटी करितां ‘ प्रेक्षक ’
घेउन, ‘ होलीवुड ’ साप्ताहिक
सौंदर्याचे बनुनि उपासक
डोळ्यांचें पारणें फेडिती ! ६०

वरीच एकर जमिन इनामी
राजाकरितां मागें ठेवुनि
वडिल तयाला जातां सोडुनि
आईची तशि उणीव भरुनी
काढित होते मामामामी ६१

मामांचें मत ठेवुन मागें
गांव सोडुनी रत्नागिरिचा
विद्येसाठीं मार्ग पुण्याचा
धरला होता त्यानें त्याचा
परंतु सुट्टित जावें लागे ६२

सुट्टींमध्यें राजापुढतीं
दावुन अपुली बहीण शामी
दिसेल जोडा कैसा नामी ?
लोभी दृष्टी ठेवुन मामी
मनांत माण्डे कितीक खाती ६३

असले कांहीं मामी म्हणतां,
नको राहणें त्याला वाटे
शामी म्हणजे फळ कोरान्टें
हृदयीं रुतती जणूं सराटे
ही तर त्याची पहा रसिकता ! ६४

सामी सुन्दर जशी ' लघुकथा '
कोंकणांतलें काजूचें फळ
झाडांवरचें पिकलें पोफळ
मादक होती जणूं जायफळ
कामाला तर तिखट कोयता ! ६५

लुगडें भरतें मण वजनाला
सुती खणाची अंगी चोळी
रंगामध्यें जरा सांवळी
कुंक्वाचा तर 'टिळा' कपाळीं
भांग मधोमध असे पाडिला ६६

सुशिक्षीत जी 'फॅशनवाली'
सदा बोलुनी 'पोपटबोली'
शरिर हालवी जशी कर्दळी
व्याख्या असली फार निराळी
सौन्दर्याची शहरांकडली ६७

या मांनानें मन्दाराणी
बघतां दिसती खडे पांचुचे
शामी निव्वळ तुकडे खडिचे
त्यांतुन राजाला शहराचे
नवें लागलें होतें पाणी ! ६८

केस काढुनी 'गोटाकम्बे'
करणें महिन्यांतुनी दोनदां
मामांचा हा कडक कायदा
धाब्यावरि बसवून एकदां
केस ठेविले त्यानें लम्बे ६९

नाकांखालीं होतां जाचक
मिशा ठेविल्या खालीं उतरुनि
जुनीं पुराणीं मतें सोडुनी
गळ्यांतलें 'जान्हवें' काढुनी
राजा बनला पूर्ण सुधारक ७०

कॉलेजांतिल बघा 'चेहरे'!
दाढी म्हणजे हिरवीं कुरणें
वरती 'स्नो'चा लेप लावणें
हिमालयांवरि बर्फ सांठणें
या खिचडीवर जसें खोबरें? ७१

स्त्रियांकडे पाहती 'कलेसें'!
उन्च करूनी माना 'बगळे'
विलसे गालांवर 'घामोळें'
ओठांवरलें चस्बुगवाळें
दिसे मिशांनीं आंवरलेसें! ७२

तारुण्याची नसे तकाकी
पिळले जर कां ओठ कुणाचे
निघेल त्यांतुन खरोखरींचें
दुधाऐवजीं पाणी 'स्नोचें'
कारण असतें 'सोंग' नाटकी ७३

गळ्यांत 'बलभीमाची पेटी'
तसा मनगटीं काळा गण्डा
अंगानें जरि नसेल गिड्डा
चाले रस्त्यानें जणुं गेन्डा
'उस्तादी' पण उसनी ऐटी! ७४

जात सकाळीं तालिम करण्यां
डोक्यांवरती 'स्कार्फ' लपेटुनि
अंगामध्यें 'जर्सी' घालुनि
पर्वतीस ये पळत जाउनी
करुनि चहाच्या आधीं गुळण्या? ७५

तालिम कसली यांत आंतला
' गनिमी कावा ' असतो मोठा
' शिकार ' साधुनि हेरित वांटा
जवळुन जातां करुनी चेष्टा
उद्देशुन कुणि वदती ' तिजला ' ७६

' मिटला मोदक ' अहा ! ' कचोरी '
' हिरवा चांफा ' ! नही ' कण्हेरी ! '
' पाडाची तर दिसे पायरी '
' छे ! छे ! नेपाळची कस्तुरी
' दूध असें आटीव केशरी ' ! ७७

सौन्दर्यांची व्याख्या करिती,
' तळणीनें ये ताम्बुल लाली
फुगिर पुरीसम गोऱ्या गालीं
श्रीखण्डाची डाव ओतली '
निथळे वरती कांचनकांती ७८

अशी मिळावी सुन्दर युवती
ही तर इच्छा प्रत्येकाची
परंतु ज्यांना नसे नखाची
मुलींच सर ते अशा ' खव्याची '
हांव धरूनी लाळ घोटती ७९

प्रेमाची मग जडते व्याधी
भलत्याची पण हांव धरूनी
कित्येकांची प्रेम-झिरपणी
अखेर जाते मधेंच आटुनि
तारुण्याची तेजी-मन्दी ! ८०

सोनूचे तर वडील असती
कर्जतगांवीं ' स्टेशन मास्तर '
पगार होता रुपये शम्भर
खर्च त्यांतुनी तसाच जब्बर
सुखीसमाधानी पण वृत्ती ८१

शिक्षण घेण्यां पुण्यास ठेवुनि
सोनू आणिक ' शकुन्तलेला '
' सत्तर ' महिना खर्चायाला
धाडुनि पैसा उरलासुरला
खर्च करावा ' हात राखुनी ' ८२

शकुन्तला मनिं म्हणें कधीं कधिं
' आई आपुली खस्ता काढी
बाबा ओढित विडी न काडी
कारण ' सत्तर ' महिन्याकांठीं
पाठविण्यां लावीत न अवधीं ! ' ८३

सुट्टीमध्यें घरीं येउनी
आईचें मन प्रसन्न राखी
दाखवून कामांत चलाखी
' कप्पी ' करि जैं ओझीं हलकी
शकुन्तलेची प्रेमळ वाणी ८४

काम कराया नको सोनुला,
' गाड्या ' बघण्या ' स्टेशनां ' वरी
सकाळ संध्याकाळीं फेरी
झोंप ताणुनी देत दुपारीं
कार्यक्रम हा सुट्टीमधला ८५

वडिलांशीं बोलतां बोलतां
पुत्र असावा ऐसा गुन्डा
कधीं न घ्यावा ज्यानें हुण्डा
लग्नामध्यें कसला ' धंदा ' ?
सोनू असल्या झोकी बाता ! ८६

शकुन्तला जरि पुण्यांत होती
आईबाबांच्या प्रेमानें
' कर्वे विद्यापीठ, ' हिंगणे
या पत्त्यांवर सदा चालणें
पत्रांतुनि तर गांठीभेटी ! ८७

महिना दो महिन्यांत चुकोनी
सोनूकडल्या हकीगतीची
पत्रें कधितरि मिळावयाची
भाषा ज्यांतच तुटकपणाची
पैशाची बहुतेक मागणी ! ८८

पुण्यांत अपुली बहीण सख्खी
या नात्यानें सोनू तिजला
दर रविवारीं भेटायाला
नेम पाळुनी कधीं न चुकला
कारण आंतुन होती मख्खी ! ८९

हिंगण्यांतल्या कॉलेजाला
येणें जाणें नित्य ठेवुनी
' शिकार ' होता सोनू साधुनि
भेटे बहिणीला वरकरणीं
प्रेमळ वाटे भाऊ तिजला ! ९०

पुण्यपत्तनीं साने डाक्टर
बडें धेंड पण फारच सालस
महिन्यांकाठीं नउशें ' प्रॅक्टिस '
' ससून ' मध्यें शिवाय ' सर्व्हिस '
शरीर मज्बुत, मुखांत साखर ! ९१

डाक्टर होते परन्तु ' बिज्वर '
मुलगा ' पहिल्या पत्नी ' पासुनि
' दुसरीला ' तर नव्हतें अजुनी
अपत्य कांहीं अर्थात् म्हणुनी
बाबू , विषयीं मनांत मत्सर ! ९२

' दुसरीची ' पुरवीत मागणी
' पाहिली ' विषयीं नसतों आदर
मदार सर्वस्वीं ' दुसरीवर '
जगांत दिसुनी येत निरंतर
प्रत्येकाची हीच धाटणी। ९३

परिस्थितीनें माणुस बनतो
बाबू तर त्यांतून सुशिक्षित
कधींच त्यानें ओळखिलें मत
' माई ' बाबांची ' नवपरिणित '
घरांत म्हणुनी सहसा नसतो ९४

दोन वेळचें घरीं जेवणें
नंतर बहुधा गांवाबाहिर
राजा सोनू च्या खोलीवर
' फकीर ' भेटे चुकलेला तर
' मशिदी ' मध्यें बाबू साने ९५

'गोड अपघात ?'

सायंकाळीं खुलते सृष्टी
निरभ्र पडली हवा जोंवरी
स्निग्ध मधुरशीं मजा तोंवरी
खेळत असतां हास्यलकेरी
उठती 'टेनिस कोर्टी' वरती १०१

रीघ न मुंगी शिरावयातें
'चिकार' गर्दी अशी अलिकडे
कोण 'चँपियन्' येतो तिकडे
कॉलेजांतिल वीर फांकडे
लक्ष लावुनी बसले होते १०२

सह्याद्रीसम बसले कोणी
जागा अडवुनि खुशाल 'ढब्बू'
हेरित होते कुणी 'गुलछबू'
राजा सोनू आणिक बाबू
तेथच रमले खेळ बघोनी १०३

चम्पा मोने, दुर्गा डोळे
'सिंगल्स्' मध्यें प्रवीण होती
जोडी असली ज्यांची ख्याती
खेळ तयांचा टकमक बघती
कॉलेजांतिल 'रसिक रिसाले'! १०४

'थर्टी,' 'फॉर्टी,' चाले 'वा! वा!
दुर्गा चेंडू हवेंत उडवी
चम्पा मोने 'रॅकेट्' फिरवी
उंच उडी मारून परतवी
प्रेक्षकांतुनी मिळे 'वाहवा' १०५

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत ११
सं. ग्रंथ नं.
ता.
ठाणे.
मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे,

चेण्डू उडतां जाळ्यांवरुनी
हवेंत दोघींच्या ' रॅकेटी '
फिरती गर्कन खालींवरती
' खुशालचेण्डू ' जागेवरती
स्तब्ध पाहती ' आ ' वासोनी ! १०६

जरी कुणाशीं दुर्गा डोळे
बोलत असतां हिसळुन येइल
हास्य ! दुधाचे जैसें ओघळ
वा, नभ-गङ्गेचे फुटुनी नळ
पृथ्वीवरतीं हास्य वाहलें ! १०७

उडता अंचळ पवनांवरती !
हिरवें पातळ तलम नेसली
त्यांतुन सोनूला तर दिसली
जणूं डोलती केळ कोंवळीं
चम्पा झुलतां मागेंपुढती १०८

' सर्व्हिस ' घेण्यां अखेरची तर
चम्पा घाईनें जों गेली
तोल सुटोनी ती अडखळली
छातीवरती तों आदळली
फेंक चेंडुची, मार भयंकर ! १०९

खालीं पडतां चम्पा मोने
छाती धरुनी जों कळवळली
सोनूनें तों उडी ठोकली
अलग तिची तनु करीं झेलली
प्रेमाची मग मूक भाषणें ११०

जगांत वदती ' प्रेम ' कशाला ?
प्रेमानें परिपूर्ण लघुकथा
प्रेमभंग होतांक्षणि कविता
कधि न कष्टला लिहितां लिहितां
हात जयाचा माहित त्याला ! १११

जगांत वदती ' प्रेम ' आंधळें
परंतु ' डोळस ' असे अलिकडे
कारण बहुधा नयन वांकडे
सुंदर वस्तूवरी चहुंकडे
प्रत्येकाचे दिसत लागले ! ११२

' प्रेम ' जडे कां कपड्यावरती ?
प्रेमाला कां ' कोट ब्लेझरी ' ?
प्रेमाला कां ' सूट काश्मिरी ' ?
प्रेमाला कां ' शर्ट कॉलरी ' ?
रुचती कां कधिं नकली मोती ? ११३

' प्रेम ' वसावें चेहऱ्यांवरि
' स्नो अफगाणी ' म्हणुन लावणें
तसा ' पॉम्पिया ' नित्य ओतणें
जैसा ' रुबराईल्ड ' प्रमाणें
कैसाच्या जणुं छप्परांवरी ! ११४

अशा भावनांनीं जे बनले
कॉलेजांतिल ' काविले ' कल्पक
गोसाव्यांसम करिती ' अलक '
परी तयांना प्रेम न पाचक !
घाटे कारण व्याख्या चुकले ! ११५

कॉलेजांतिल बघतां युवती
दिसावयाला दांत पावटे
हातांचे जणुं चमचे कांटे
डोळ्यांचे जरि पोकळ भाते
बाण त्यांतुनी तरी सोडिती ११६

तरुणाची वा म्हाताऱ्याची
सुंदरतेवर फक्त भाळणें
सुंदरता नेहमीं हेरणें
सुंदरतेमधिं खूष राहणें
व्याख्या अशि असते प्रेमाची! ११७

' प्रेम ' कुणाला चीज वाटते
मजेत जी उपभोगायाची
कळी अकालीं खुडावयाची
घेति कस्तुरी वा हरिणाची
करुनी हत्या भरिती पोटें! ११८

' विषय ' आणखी ' प्रेम ' निराळें
कुठें चुनखडी कुठें चांदणें
सारंगी तर कुठें तुणतुणें
कविता कोठें गद्य लिखाणें
एक कमळ दुसरें शेवाळें! ११९

वास उरावा सुकल्यानंतर
बकुळीचें फुल किंवा केशर
प्रेम पडे अथवा हृदयांवर
तुषार जैसे पुष्करणीवर
प्रेम पाहिजे असें निरंतर १२०

'प्रेम' नसें सांवळें ओवळें
प्रेमाला ना वयमर्यादा
'खानमालिनीचा' न कां खुदा ?
'मिलरतुकोजी' कोणी निन्दा
'प्रेम' एक पण पन्थ निराळे ! १२१

प्रेम कुणाचें कुणाशीं जुळें !
उघड परन्तू कधीं न होई
म्हणुन जीवनाची हो खाई
कित्येकांनीं ऐशा समयीं
प्रेमापुढतीं हात टेकलें ! १२२

परस्परांवरि प्रेम जडाया
कारण पुरतें कांहीं थोडें
परस्पर्श होतांच आवडे
स्पर्श परासम कीं मउ पेढे
स्वर्ग येत खालीं करद्वयां ! १२३

पाहिल्या क्षणीं प्रेम जडावें !
दृष्टी नुसती सौन्दर्यावर
सौन्दर्याला पडतां ओसर
नन्तर उतरें प्रेमाचा दर
कसें प्रेम चिरकाल टिकावें ? १२४

प्रेमभंग होतां ये उलटी
निराशेमुळें दिसति कसाई
दौतीमध्यें काळी शाई
भांड्याची जणुं उडली कल्हई
कळकट तोंडें करुनी बसती ! १२५

कॉलेजांतिल तर युवयुवती
प्रेम कराया मुळांत चुकती
खरें प्रेम त्यांना न माहिती
नजर चोरटी वा ओझरती
प्रेमाची ते खूण समजती ! १२६

प्रेमाविषयीं मतें वेडसर !
पाण्यांमध्यें जसे लव्हाळें
स्त्रीच्या पुढती तसें वाकले
पुरुषांनीं पाहिजे राबलें
म्हणजे मिळतें प्रेम खरोखर ! १२७

प्रेम कराया प्रगट आपुलें
' टेनिसकोर्ट् ' वर व ' लॅबोर्ट्री '
' जिम्खाना ' किंवा ' लायब्ररि '
कुठें कुणी ' फर्ग्यूसन् हिल् ' वरि
मार्ग असे हेरुनी ठेविले ! १२८

करुनी घेण्यां हृदय मोकळें
प्रेमपत्र कुणि लिहुनी कळवी
प्रेमगीत कुणि करुनी दे कवि
भेटीस्तव कुणि वस्तु पाठवी
' प्रेम ' एक पण मार्ग निराळे ! १२९

यांस्तव हल्लीं ज्याला त्याला
प्रेम लागतें कडू करटुलें
कारण कीं असतें अलिकडलें
प्रेमच विषयानें लडबडलें
पक्वान्नाचा पंक जाहला ! १३०

वसतिगृहांत सकाळ होतां
कुणाच्या तरी खोलीवरती
जमुन चार चौघेजण करिती
वाङ्मयावरी गप्पागोष्टी
मधुनीं मधुनीं चहा प्राशितां १३१

' अन् ' म्हणजे ' माधवज्यूलीयन् '
' सान ' शब्द दे काव्यआचके
' मायदेव ' कवि म्हणुनि ओळखे
' परि ' वरतीं प्रिय ' अत्रे पी. के. '
बी. ए, बी. टी. टी. डी. ( लंडन् ) १३२

' गिरीश ' अपुले ' तसें चौधरी '
' काव्यरूल ' बदलणार सान्धा
' ग ' आणिक ' बाईची ' बाधा !
काव्याला दे मोहक बान्धा
गळ्यांत त्यांच्या नादमाधुरी १३३

' यशवन्तांचें ' काव्य प्रवाही
त्यांतच उपमा ठायीं ठायीं
आणि रूपकांचीच नवाई
पवित्र मथुरेमधिल मिठाई
दृष्टी पूर्ण असे अवगाही १३४

मृदू मधुरशी भाषा सुन्दर
लिखाणामधें बरीच पटुतां
शब्दोशब्दीं आकर्षकता
दिसतें कादम्बरी पाहतां
' फडक्यांची ' ' अल्लाहो अकबर ! ' १३५

गायनामधें जशी भैरवी
परिणामीं तर तशी लघुकथा
जणूं भासते वाङ्मयवनिता
तिलोत्तमेची मूर्ति चारुता
' गुर्जर ' ' खांडेकर ' कीं घडवी १३६

विडम्बनाची प्रथा पाडुनी
कधिं चिमटे तर कधिं कोंपरखाळि
काढुन कधिं घे अस्वलगुदगुलि
परि जनता हंसवून सोडिली
' अत्र्यांची ' अशि विनोदवाणी ! १३७

साङ्ग कुणाचीं अण्डींपिल्लीं !
विडम्बनाची पिटुनी थाळी
जरी जमविली खूप मण्डळी
कवितेची संख्या कां घटली !
छे ! कवि झाले गल्लोगल्लीं ! १३८

अशिलांच्या ' भाल्यांत ' त नोटिशी
' मौज? '-भविष्यें आठवड्याचीं
' सकाळ 'मध्यें मुलाखतींचीं
' केसरीं 'त गृहसंस्कारांचीं
फक्त वर्णनें वाचनीय अशि ! १३९

नसती आग्रह कीं बदला ग्रह
प्रवाद कारण खुल्या दिलाचे
कॉलेजातिल विद्यार्थ्यांचे
कुठें तरी ते चालायाचे
वसतिगृह वा विश्रान्तिगृह ! १४०

१५

वसतिगृह जणुं दिसे बङ्गली
दो मजली त्यांतून ठेंगणी
सुबक मनोहर असे बान्धणी
आंत राहती परी नागिणी
कात दिखाऊ कुणि न टाकिली ! १४१

भंवती वाहे मोकळी हवा
गोकर्णाच्या वेलींचे पण
कुंपणावरी वसलें वेष्टण
मध्ये स्वच्छ वालुका-पटांगण
बाजूला वाहतो कालवा १४२

अशा ठिकाणीं जाळें बान्धुनि
मजेंत बहुधा चालायाचा
सायंकाळीं ' बॅड्मिंग्टन्चा '
खेळ त्यांत विद्यार्थिनींचा !
नवल नसे उठतीं हास्यध्वनि ! १४३

केशकलापांवरुनीं खालीं
नितम्बांवरी वेण्या रुळती
दोन नयन, नासिका एकटी
जणूं दहाचा नम्बर दाविति
म्हणुन स्त्रीला ' नागिण ' म्हटली ! १४४

सर्पाची तर सुन्दर शय्या
बसे धनाचा राखित हण्डा
अथवा विळखा चन्दनखोडीं
कधिं न सोडि वा मित्र केवडा
तसा भासतो दारीं भय्या—! १४५

—वसलेला वसतिगृहाच्या !
कारण करि मज्जाव एकला
आंत जावयां छात्रगणाला
तरुण त्यांतुनी चुकलामुकला
घिरट्या घाली उगिच फुकाच्या ? १४६

लहानशा शीतल झुडुपाचें
आसपास सौगन्ध दरवळे
सहज परन्तू काधिं न जें मिळें
हिरव्या पर्णान्तीं लपलेलें
फूल जसें हिरव्या चाफ्याचें ! १४७

किंवा आगमनां वासन्तिक
आम्रपर्णि कोकिळा कूजतें
मधुर गान ऐकाया मिळतें
क्वचित् परन्तू दृष्टिस पडतें
नैसर्गिक लाजाळू गायक ! १४८

अशासारखीं ये नजरेला
परिस्थिती वसतिगृहातें
ताना मिळती ऐकायातें
व्यक्ती आंतिल मधेंच दिसते
वाटे जणुं काजवा चमकला ! १४९

वसतिगृह विद्यार्थिनींचें
सर्व बाजुनें जें रम्यस्थल
मन्दा, चम्पा मोने त्यांतिल
आणिक ' दुर्गा ' कॉलेजांतिल
त्रिदळ भासतें जणुं बेलाचें ! १५०

कां स्त्रीची जन करिति आरती ?
वृक्षां वेष्टण जशी वल्लरी
किंवा कोयल आम्रतरूंवरि
मदन पीडितां शान्त शर्वरी
तरुणाला तर तशी रम्य रति ! १५१

रमणी त्यांतुन सुंदर असतां
सौंदर्याची कां न करा स्तुति ?
लज्जामिश्रित छटा फांकिती
' अवनतमुखि ' धरि करीं हनुवटी
रसिक रंगती बघतां बघतां ! १५२

लुब्ध राहती कुणी कशांवर ?
पिकलेल्या पेरूवर पोपट !
दुग्धासाठीं मांजर लोचट !
तरुण बनें तरुणीशीं चावट !
आंग्लस्त्रीच फिदा कुत्र्यांवर ! १५३

दिसून ये जरि अशी वेगळी
जगांतली रुचिभिन्न राहणी
अखेर निघतें सार त्यांतुनी
कीं स्त्री असतें पुरुष मोहिनी
सुंदरतेची सुखद सांवली ! १५४

सूर अलगुजामधून निघती
त्यांत शुकाची मंजुळ वाणी
शुक्राची वर खुले चांदणी
रस्त्यांवरुनी तीन नागिणी
मंद मंद पाउलें टाकिती १५५

पदर बसवुनी नीटनेटका
भांग कडेला थोडा कलता
पाठीवर सोडून शेपटा
करांत कर घालुनी चालतां
जणूं भासती नागकन्यका ! १५६

जवळ वयाच्या तीन मैत्रिणी
खट्याळ थट्टेमधें बोलतां
शरिराला चालतां चालतां
मधेंच जी दे ' लचक ' चारुतां
वळवळत्या शोभती नागिणी १५७

कॉलेजांतिल ' काळवीट ' कुणि
त्यांच्या मागुन मागुन जातीं
मधेंच कोणी शीळ घालिती
कुणीं त्यांतले ताना घेती
पुढं चालती तशाच ' हरिणी ' १५८

मन्दाराणी धीट त्यांतली
मागें कलती तशी किलकिली
नजर तिनें जों हळुंच टाकिली
हातांवर तों देउन टाळी
सुरूं पुन्हां जाहली टवाळी १५९

' वेताळाच्या टेकड्या ' तळीं
उन्हे कुठें नुकतींच कोंवळीं
पडूं लागलीं ऐशावेळीं
दुर्गा, चम्पा, मन्दे जवळीं
हास्यविनोदामधें गुंगली १६०

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत १७
सं. नं.
ता.
ठाणे

‘ वेताळाच्या टेंकडी ’ वरी--
खुलीं सपाटीं बरीच होती
प्रसन्न वातावरणीं शान्ती
त्यांतुन पडलीं उन्हें-प्रभातीं
खुले हिर्वळी क्षण सोनेरी १६१

शान्त परंतू श्यामल कातळ
भिरभिरणारा वायु वाहे
वरतीं पाचोळा उडताहे
राघूंची नभिं रांगच पोहे
निम्बोणीवर गाणीं मंजुळ १६२

निसर्गशोभा अशि रम्याकुल,
म्हणजे जावळ—ना मउ मखमल
स्त्रीच खरी—ना स्त्रीलट केवळ
नकली ना—पण मोती अस्सल
मनुजाची तीपुढें न शक्कल १६३

“ अलीकडे बर कां गे दुर्गें,
मन्दा मनमोकळी न बोलत
तुला न त्यांतिल ठाउक इंगित
अतां पहा बोलेल पटापट
मुकी मासळी उसळुन रागें १६४

काल एक माणूसच किनई
‘ तास ’ सम्पला तरिही होतें
वर्गामध्यें फक्त एकटे
तिला वाटतें कुणीं न बघतें
अतां पहा चिरचिरेल ‘ सनई ’ १६५



५

कशांस ही क्षणकाल ' छावणी ' ?
' डिफिकल्टीचें ' सोंग साधुनी
अभ्यासाच्या सबबींवरुनी
परंतु आंतुन प्रेमपेरणीं
खरोखरीं ही अतर्क्य करणी ? १६६

कुणांस्तवच हा असेल हेतू ?
नवा तरुण तो बघ ' प्रोफेसर '
' पोएट्री ' शिकवितात ते तर
मला न स्मरतें नांव बरोबर
हो हो मन्दे, सांग गडे तूं ! " १६७

बरीच कीं तूं चम्पे बाई !
उगाच भलभलतेसें कांहीं
बडबडणें मज सम्मत नाहीं
तुझें गुपित माहिती मलाही
टेनिसकोर्टावरची ' घाई ' ! १६८

त्या दिवशीं ते सोनू कर्वे
करढ्यांची करतां मउ उशि
झेंप घेइ चम्पा मधमाशी
पुरूरव्याची दिसे ऊर्वशीं
कां गालींचे फुलति ताटवे ? " १६९

" पुरे अतां चावट चर्चा ही
झपझप उचला चला पाउलें
कॉलेजांतिल डोम्बकावळे
बघा वळूं इकडेच लागले
'मन्दा, दुर्गा, चला ग बाई ! " १७०

## ' पारशी युवती—'

आजकालच्या कितीक तरुणी
कॉलेजांतिल शिक्षण घेती
धीट तरी त्या कधीं न बनती
न बोलणें चालणें ठेविती
विद्यार्थ्यांशीं तुटक राहुनी ! १७१

कुणी कधीं केला जरि आग्रह
न बोलती तरि वाटुनि अवघड
मनांतुनी इकडे तर आवड
' परपुरुषाची भेट भयप्रद '
मुळांत करुनी घेति असा ग्रह ! १७२

कुणि म्हणती या अजाणतरुणी !
सहशिक्षण पाहिजे परंतू
सहमैत्रीचे नकोत तन्तू
कारण भलतां मनांत किन्तू
बोलुनचालुन मुली ' दक्षिणी ' !

जरी भेटतां समवय मैत्रिण
बोल बिलन्दर करिती वरुनी
अन्दरकी परि गोष्ट लपवुनी
न दे कशाचा थांग लागुनी
कुढा संशयी स्वभाव कारण ! १७४

वागण्यांत थोडी मखलाशी
लघाळ भाषा, रसाळ वृत्ती
नुसत्या संभाषणांत अनीति
परपुरुषापाशीं न मानिती
युवती चेष्टेखोर पारशी ! १७५

तलम मलमली उन्ची कापड
त्यांतुन असते सवंग नेसण
खुले मुलायम देहप्रांगण
ज्याच्याल्याच्याशीं मधु भाषण
बघतां येइल तरुणां झांपड १७७

ये ध्यानीं ओझरत्या नजरी
चरण चालतां दडपित टाकिति
खुले त्यामुळें टंच अंगलटि
वट एकादीं निटिलावरती
दिसे डाग जणुं चंद्रम्यावरी १७७

अशा सुन्दरी सन्निध असतां
लोह हेम हो परिसस्पर्शी
ढगराशी कार्पास करी शशि
प्रसन्नतेला नको मज्लशी
उडून जाइल उदासीनता १७९

घेउन अपुल्या जातीची कड
म्हणाल तुम्हीं मला कदाचित
विनय दक्षिणी स्त्रीला शोभत
एक जहर तर दुसरें अमृत
कुठें सोमरस वा सोमलपुड ? १७९

पटतो ना मज युक्तिवाद हा
कारण ' दक्षिणि मुली ' बाळगति
सुशिक्षीत असुनीही भीती
नुसती वाचाळता-ना कृती
खूप आणखी-कशाला लिहा ? १८०

वेताळाच्या लगत खालतीं
रांग आंबराईची हिरवी
आंतिल टेकाडाला खुलवी
जसा कांहिं गंभीर मौलवी
बसला वेढुन हिरवी छाटी ! १८१

खळखळतो ओढा जशि टिटवी
दूर कुठेंतरि अंतरांवरी
खडकाच्या अन् थरांथरांवरि
वस्त्र अन्थरी धवल लोंकरी
निसर्ग दावी हास्य—टवटवी १८२

बगळ्यांच्या उडणाऱ्या श्रेणी
निळ्या नभीं जणुं धवल विमानें
निसर्ग अपुल्या अस्तित्वानें
बदक पोहते, करि लीलेनें
जळीं जशी विहरे जलवाहिनि ! १८३

अशासारखीं रम्य ठिकाणें
नीट हुडकुनीं प्रथम ठेवणें
नंतर तेथें जाणें येणें
नित्य ठेवुनी काव्य खरडणें
हां हां म्हणतां अन् ‘ कवि ’ होणें ! १८४

अशा तऱ्हेनें सौन्दर्याचे
भोक्ते म्हणुनी म्हणवुन घेणें
प्रेमपात्र कुणि मनांत धरणें
‘ तिच्या ’ वरी मग रचुनी कवनें
त्यांत गुंगती कच्चे-बच्चे ! १८५

असल्या वीरांचा कार्यक्रम
'तिच्या' मागुनी रोज हिंडणें
'तिला' नेहमीं फक्त पाहणें
कधींही 'तिच्याशीं' न बोलणें
प्रेम 'गुप्त' करिती हे 'गौतम'! १८६

'मुकेपणांतच खरी माधुरी'!
मतांस असल्या पुष्टी देती
मुकेपणाची धरुन सम्मती
'असे आपणांवरती प्रीती'
तिची मुग्धता-सतेज तगरी! १८७

असले विद्यार्थी मग होती
'ती' च्या हिंवतापानें भ्रामक
'ती' ची मिळतां ऊब अचानक
लगेच फुटतो घाम भयानक
प्रेम कशाचें, कुठली प्रीती? १८८

दिसतां प्रणयी कुणी जोडपें
कपाळांवरी चढवुन आठी
मेन्दूवरची दावुन कवटी
'आ' वासुनि हे बघूं लागती
निर्विकार जणुं खुले लिफाफे! १८९

अखेरींस एकादे दिवशीं
कॉलेजाला होतां सुट्टी
वडिल घरीं बोलावुन नेती
तिथेंच त्यांचें लग्न ठरविती
सरते मग 'वेताळ—पंचाविशि' १९०

मराठी ... ग्रंथालय
स्थळ प्रत २०
सं. ग्रंथ नं. ११०२
ता.

कुणी महाशय होती वेडे
'इश्य' अन् 'गडे' शब्द ऐकुनी
कधिं कङ्कणरव येतां श्रवणीं
बघूं लागती कान उभारुनि
एकसारखें हे 'मनकवडे'! १९१

'खोली' वरतीं तिन्ही त्रिकाळीं
प्रेमाचीं पुस्तकें वाचणें
प्रणयी कविता मुखीं घोळणें
आंग्ल स्त्रीची चित्रें बघणें
दिनचर्या ही यांची ठरली? १९२

कॉलेजांतिल बागेमाजीं
तसेंच 'लायब्ररींत' केव्हां
टेकडीवरीं चाखतां हवा
वर्ग सुरू असतांना अथवा
बघती 'मस्तानी' हे 'बाजी'! १९३

नजर त्यांतल्या एकादीवर
ठरेल यांची फक्त निरन्तर
असेल जर 'ती' नयनमनोहर
कारण नसतें लक्ष मधांवर
असतें बाहेरील फुलांवर! १९४

जिच्यावरी हे नजर ठेविती
तिच्या सदा मागावर असती
तिजसङ्गे बोलणें चाहती
मनांत पुष्कळ!—परन्तु भीती!
रोज फुकटच्या भेटीगांठी!... १९५

स्वभाव उल्लू, पण उतावळा
‘ तिचा ’ शब्द जणूं वाटे स्वाती
हास्यविनोदाचे मग मोती
‘ तिचा ’ शब्द सुटण्याची खोटी
तत्पर असती झेलायाला ! १९६

धीट त्यांतुनी जर ‘ती’ असतां
भेटीअन्तीं भाष्य होतसें
यांना वाटे त्यांत ‘ कसेसें ! ’
परन्तु खर्चति फुलांत पैसे
‘ तिची ’ त्यांतली आवड बघतां १९७

‘ भेटवस्तुचा ’ करुनी स्वीकर
हास्यरुपानें ‘ पोंच ’ दिली तर
‘ प्रेम तिचें आहे अपुल्यावर ’
असें मानुनी प्रेमाखातर
देति भाषणीं पेरुन साखर ! १९८

अखेर कांहिं न येतें हातीं
मुळांत कारण समज चुकीचा
यांचा आडाखा वरवरचा
‘ तिच्याच ’ मनमोकळेपणाचा
गैरअर्थ करुनी हे घेती १९९

अखेर होतें एके दिवशीं
‘ तिचें ’ लग्न कोणां तिसऱ्याशीं
पडती मागाहून ‘ तोण्डघशि ’
प्रेमापायीं गळे बाप्तिशी
चढणारी येते खालीं मिशि २००

कॉलेजांतिल कुणि ‘ जर्दाळू ’
शिङ्काळ्यांतिल गोड कांकवी
निदान दूरुन तरि चाखावी
वर्ग सुरूं असतांच मिळावी
यांस्तव करिती प्रयत्न चालूं ? २०१

वर्गांतिल ‘ वळवळ्या शेंवया ’ ?
कुणि त्यांवर पाडिती ‘ कवडसा ’
उन्हांमधें धरुनिया आरसा
कारण मिळतो क्षण इवलासा
‘ ब्यूटीचें ’ रसपान कराया ! २०२

मिळें अशासमयीं बघण्याला
नजर बावरी तशी मिणमिणी
जणूं चकाकें सुरी इराणी
रुतें कुणांच्या उरीं पराणी
जो, तो, प्रेमामधें ‘ बावला ’ ? २०३

कुणी कधीं जर एकादीला
अपुलें पुस्तक वाचायाला
सहज दिलें तर वदती त्याला
‘ जोडी खाशी, मजनूं-लयला ’
‘ इम्प्रेशन ’ मारूनि राहिला २०४

कुणां मुलीनें कधीं पाहिलें
कुणि एकाद्याकडे वळोनी
एकसारखें टक लावूनी
त्यांत आणखी जरा हंसूनी
लगेच काहुर दिसेल उठलें ! २०५

सहल कराया सह गेलें तर
कुणि वदती त्यां ‘ राधामाधव ’
कुणी हिणविती ‘ सीताराघव ’
कुत्सित अर्थीं भगिनी–बान्धव
खुशाल गुणगुणती हे ‘ मच्छर ’ ! २०६

कारण असतें दृष्टी अन्धुक !
पतिपत्नीच्या शिवाय नातें
दुसरें यांना कधीं न दिसतें
प्रेमाविषयीं मत उफराटें
‘ प्रेमाला सहमैत्री पोषक ’ २०७

मुलींवरी ‘ इम्प्रे ’ बसवीतो,
‘ क्रिकेटच्या ’ सामन्यांत कोणी
‘ जॉकीचा ’ पोषाख घालुनी
मधेंच ‘ टेन्टा ’कडे पाहुनी
अकरावा पण असे गडी तो ? २०८

वार्षिक सम्मेलनाप्रसंगीं
तसेच कॉलेजांतिल कोणी
नाटकांत मुखडा रङ्गवुनी
‘ इम्प्रेशन् ’ घेतात मारुनी
दाविति मेरू असून मुङ्गी ? २०९

प्रेम कराया प्रयत्न करिती
‘ सेक्रेटरि ’ कुणि म्हणून मिरवुनि
कुणि खेळांत प्रवीण होउनि
अथवा ‘ त्रैमासिकांत ’ लिहुनी
‘ पुढें पुढें ’ करण्याच्या रीती ! २१०

कॉलेजांतिल जवान कांहीं
ज्यांची असते छाती निधडी
तुटो शेपटी अथवा शेन्डी
‘ दहिकाल्याची ’ फोडिति ‘हण्डी’
त्यांना तरुणी हलकी ‘लाही’ ! २११

त्यांची असते विचारसरणी
तरुणी म्हणजे फूल न केवळ
तरुणी म्हणजे नहि मउ मख्मुल
अथवा नसने धुतला चावल
‘खुळखुळणारी परंतु नाणीं ’ ? २१२

करुनी आधीं खूपच गिल्ला,
‘ शिकार ’ मिळण्या ‘ रान उठविणें’
त्यांच्या मागांवर मग जाणें
रुचे न असलें धीर धरविणें
निकराचा तर यांचा ‘हल्ला’ ! २१३

प्रेम ‘खुलें’ हे करून घेती
कुठें कालव्याच्या बाजूला
तिज सङ्गे कधि घेउन ‘शो’ला
एकान्ताच्या बघून वेळा
‘ खोली ’वर बोलावुन घेती ! २१४

काम कराया ‘ सोळा आणे ’
उघड टाकुनी देति सवाला,
‘ घ्या कादम्बरि वाचायाला ’
आंत लखोटा परि दडलेला
पत्र लिहूनी ‘ खडा टाकणें ’ ? २१५

हातांमध्यें भरे ‘ कांपरे ’
उचम्बळे स्त्रीची नैसर्गिक
‘ लाजलाट ’, घेतांना पुस्तक
पिकल्या काजू परी अचानक
तोण्ड दिसें कावरें बावरें ! २१६

अशा तऱ्हेनें खात्री पटतां
‘ तिच्या ’ बङ्गल्यावर हे जाती
घरांत कानोसा मग घेती
‘ पाहुणचारा ’ बसे ‘ अतीथी ’
तिनें माण्डिचा पाट माण्डितां ? २१७

देती नन्तर विधान ‘ठोकुन’,
‘ द्राक्षवेल घे पाङ्गाऱ्यांवर
जशी जीवनाधार निरन्तर
स्त्रीच तशी जगतीं पुरुषांवर
असते सर्वस्वी अवलंबुन ! २१८

प्रेमी-वीरांची तर इच्छा
साय फुङ्करुनि दूधच प्यावें
तोण्ड पुसोनी मग टाकावें
पुन्हां जसेच्या तसें रहावें
इच्छेस्तव पुरवावा पिच्छा ! २१९

पुढें अशांना मिळे इषारा,
‘कीं, नसतें स्त्री नुसती प्रेमळ
शीलाविषयीं असते जाज्वल’
राख फुङ्कतां वरची पातळ
दिसे प्रज्वलित आंत निखारा ? २२०

नवे नवे येती ' प्रोफेसर्स् '
कुणि विद्यार्थ्यांना होती प्रिय
तसेंच कोणी ठरती अप्रिय
विद्यार्थिनि बघती त्यांचें वय
कां तर पदवी बी..ए. ( आनर्स् ? ) २२१

छे ! छे ! तुम्ही अगदीं चुकलां
गुरुशिष्याचें नातें विसरुनि
' डिफिकल्टीचा ' आंव आणुनी
लगट कराया बघती कोणी
तरुण त्यांतुनी तो जर असला २२२

सहज निसर्गाचें आकर्षण
मधांजवळ माशी घे घिरटी
अथवा मुङ्गी गुळांभोंवती
सुन्दर युवकां बघून युवती
मन्त्रमुग्ध होते जणुं नागिण ! २२३

या नियमाला कीं अनुसरुनी
धुन्दी मात्रच चढते उलटी
विद्यार्थिनिची नजर चोरटी
वळतां नन्तर होती भेटी ?
उम्दा ' प्रोफेसर ' पाहोनी ? २२४

' ताज्या घोड्यांवर गोमाशा '
चिकटाया जरि चुकून बघती
कुठें असे पण गुरुची नीती ?
' होडी ' वल्हवायाची रीती
उलट दाखवुन देत हमेषा ! २२५

ज्यांत मिसळलेलें शेंवाळें,
स्वच्छ जशी जल करिते तुरटी
तशी असे जगभर जी ख्यातीं
‘ शिक्षणांमुळें ’ निवळें दृष्टी
तों तर दिसतें दृश्य निराळें ! २२६

असेच होते कुणि ‘ प्रोफेसर ’
नांव उघड साङ्गणें कशाला ?
स्वभाव उल्लू, करिती लीला
लेखक म्हणुनी महाराष्ट्राला
परिचित अगदीं कीं, ‘ अग्रेसर ’ २२७

टोपण त्यांचें नांव ‘ माधवन् ’
धर्म ख्रिस्ती ! झाले बाट्टुनि !
ठेवित अपुलें वय दडवोनी
ओंठांवरची मिशी पुसोनी
झांक तगविती कशीबशी अन् ? २२८

उभी राहण्याची ती ‘ ऐटी ? ’
चिमटीमध्यें ‘ पिवळी माती ’
म्हणजे तपकिर ‘ कृष्णम्भट्टी ’
शिकविण्यांत होती हातोटी
विषय असे कारण ‘ पोएट्री !’ २२९

कॉलेजांतिल मन्दाराणी
वरच्या या भपक्याला भुलली
कोळयाच्या जाळयांत अडकली
प्रेमाच्या पङ्कांतच रुतली
राजा भावे गेली विसरुनि ? २३०

प्रभातकालीं पूर्वचिन्ह जें
शुक्रचान्दणी गगनीं यें वर
मधुपक्ष्यांचें गाणें नन्तर
प्रकाश रविचा फांके धूसर
परन्तु घोरत ' बालिशराजे ' !  २३१

निजावयाला ' कॉट ' दिवाणी
' किर्लोस्कर ' लोखण्डी मज्बुत
मधुर स्वप्नीं तरुण गुङ्गत
थाटानें बहु खोली शोभत
जाळिदार वर मच्छरदाणी  २३२

त्यांमध्यें घोरत पडलेले
असती पण 'सिंहाचे शावक'
उशालगत पडलेलें पुस्तक
जरा चाळतां खात्रीलायक
साङ्गा तुम्हां काय कळालें ?  २३३

'कीं असते ते विषयापिपासू
लिखाण सडले जसें टमाटो;
शिक्षण व्यभिचाराचें देतों
'समाजस्वस्थ्याचाच' अङ्क तो
बघा छात्र तर हे अभ्यासू ?  २३४

अपक्व असलें वाचन चाले
'सन्ततिनियमन' विषय घेउनी
असम्बद्ध त्यांवर बरळोनी
खुशाल देती मत झोकोनी
नसतें त्यांचें लग्न जाहलें !  २३५

कॉलेजांतिल तासावरती
आठाचे पडतील ठणाणा
टोले तेव्हां उठे ‘दिवाणा’
आळस देउन घेई ताना
खुलीं पटापट दारें होतीं २६६

दिसेल तुम्हांला मागाहुन
जिकडे तिकडे ‘स्टोव्ह पेटले’
आधण वरतीं उकळुन गेलें
पेल्यामागुन ओतित पेले
सम्पायाचें न चहाप्राशन ! २३७

नन्तर होते सुरू टवाळी,
अभ्यासांस्तव कुणी काढिती
‘ रात्रीं जागुन ’ तया डिंवचती
‘ स्कॉलर ’ म्हणुनी थट्टा करिती
जातां येतां तिन्ही त्रिकाळीं ! २३८

सांवरीत मग माण्डचोळणा
खांद्यावरती ‘टुवाल’ टाकुन
सिगारेट ताजी शिलगावुन
पायांमध्यें खडाव घालुन
दिसती हे ताना घेतांना २३९

‘ स्नानगृहांस ’ लोटे गर्दी !
‘ काळीं चार ’ कुणाची पट्टी
गन्धर्वाचीं गाणीं गातीं
कुणि अस्फुट काव्यगान करिती
जो, तो समजे आपण ‘ दर्दी ’ ! २४०

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्वच्छ प्रत २५
सं. ३१ नं ११०२
ता.
ठाणे

कॉलेजांतिल ' क्लबांत ' केवळ
धामधूम कीं चालू असते
अकराच्या आधीं ये भरतें
अकराच्या नंतर ओसरतें
दर्यामध्यें पुष्कळ खळबळ ! २४१

दर्याचें ओसरतां पाणी
उडते टपटप जशी मासळी
चन्देरी चमकतें झळाळी
तशीं ताट-वाट्यांचीं टाळीं
झडूं लागते चहुं बाजूंनीं २४२

कारण साडेदहा वाजती
इकडे कॉलेजाची घाई
तर तिकडे पोटाची खाई
आचाऱ्याची फुटते लाही
कहर शिट्यांचा ' क्लब ' घुमवीती २४३

एक म्हणे, ' भटजी दहि वाढा '
पुकारितो दुसरा तर, ' पोळी '
पाण्यांस्तव कुणि दे आरोळी
तिकडे चवथा घेतो केळी,
जेवायाचा लिहून ' खाडा ' ? २४४

अन्नाची मग चिकित्सा सुरू !
कुणि म्हणतो तें आंबट आहे
तेंच म्हणे कुणि खारट आहे
तऱ्हेवाइक नमुने बघा हे
बदे कुणी ' वा ! भाजी मारूं ! ' २४५

जेवणांवरीं चाले चर्चा,
अमका प्रोफेसर बघतांना
जणूं शोभतो ' बहिरि ससाणा '
उपमा देती कितीक नाना
कुणी बोलतो तो ' करकोंचा ! ' २४६

कुणी साङ्गतो समोरच्याला
' पहिल्या बांकावरचा तो ! रे !
ऐटीमध्यें बघतो मारे !
सोडण्यास अकलेचे तारे,
नियमानें बसतो मोर्च्याला ! ' २४७

त्यांवर वदतो कुणि, तिसऱ्याला,
' तो ! ना ? तो गुजराथी शाम्ळू
घोळुन घेइल कां जर्दाळू ?,
छे ! छे ! अशक्य तो लाजाळू !
यांवर मजली हंशाच पिकला २४८

जेवण झाल्यावर हा गिल्ला,
सम्पे कारण जो, तो, ' मारी '
बडीशेप आणखी सुपारी
वदे पान बघतां आचारी
' कुक्कुट ' ताटांमधें नाचला ? ' २४९

' क्लबांत ' दर रविवारीं झडते
' फीस्ट ' गोडशा पक्वान्नांनीं
' चान्दण्यांतलीहि मेजवानी '
होते सुन्दर अधुनी मधुनी
आचाऱ्याची पोळी पिकते ? २५०

मनांतुनी त्यां खवीस म्हणती
कारण रुपये मोजुन पंच्विस
धाडुन देतो अपुला 'बापुस'
महिन्याकांठीं परन्तु चाळिस
इकडे यांना अपुरे पडती ! २५१

चैन कशी यांची चालावी ?
सिनेमांस पाहिजेत पैसे
'खुदानूर !' खावयां 'समोसे'
खाल्ल्या घरचे मोजित वासे !
मदत कशी बापाला व्हावी ? २५२

नवेनवे कपडे घेण्याला
'ब्ल्यू ब्लेझरचे' कोट शिवायां
रोजीं हॉटेलांत खावयां
खुळखुळणारी लागत 'माया'
बापाच्या परि चाट खिशाला २५३

कधीं कधीं तर कमाल होते
स्वच्छ धुवट कपडा परिटाला
कडक इस्तरी करावयाला
खुशाल देती दरदिवसाला
कारण 'घळ' पडलेलि न खपते ? २५४

पहिली तारिख असे पर्वणीं
खानावळिचें देउनिया 'बिल'
उरल्या पैशांमाजीं चङ्गळ
कोणाचा त्यांच्यावर अम्मल ?
करोत तिकडे वडिल 'कार्कुनी' ! २५५

अखेर महिन्याची पण येतां
तोण्डें त्यांचीं सुकूं लागतीं
कुठें कधीं बाहेर न पडती
खोलीमध्यें कोण्डुन घेती
लाज वाटते पैसा नसतां ! २५६

स्मरण पुन्हां मग घरचें होतें
' आईला किंवा बहिणीला
तसा धाकट्या काधिं भावाला
नमस्कार नुसता न लिहीला '
पैशापायीं तुटते नातें ! २५७

तीर्थरूप वडिलांसेवेशीं,
कुलस्वामिनी जयदेवीचा
प्रसाद देते मजला वाचा
चिरंजीव बालकें सदूचा ?
पुण्याहून प्रणिपात तुम्हांसी ? २५८

ठरावीक हा लिहुन मायना,
अधोरेखती कांहीं ओळी
कोपऱ्यांत पण मिळे खुशाली
पैशाकरितां युक्ती सगळी
पत्र धाडिती सरतां महिना ! २५९

' पत्र वाचण्या नको चाळिशी !
सूर्य बघाया नको मशाली !
अधोरेखिल्या बघतां ओळी
पैशाकरितां पत्रें सगळीं ! '
बापाला कळतें मखलाशी २६०

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत २७
सं. ........ नं. ........
ता. ........

'तास' ला जे देती 'बुट्टी'
त्यांच्याकरितां 'काफे यूनिक'
बसावयाला जागा मुब्लक
वेळ दवडण्या साधन माफक
'ऑर्डर' फक्तच 'द्या सिङ्गल् टी' २६१

बलाकापरी गर्दन लाम्बट
वर्तमानपत्रांत खुपसणें
पण चोरुन बाजूला बघणें
तोंडाला कप मधुन लावणें
मधुन चघळणें 'खारें बिस्किट' २६२

तशांत अपुल्या मित्रांकडुनी
खाद्यपेय मिळण्याची खोटी
तोंच त्यांवरी ताव मारिती
सिगारेट सर-सहा फुंकिती
वरती ढोशित मागुन पाणी २६३

थण्डगार मग होतां आत्मा
सपाट्यांत बहु चर्चा चाले
कुणी म्हणे, 'ती वेणू काळे,'
'पाहिलीत कां बुवा! गोखले?'
'बिब्बी शोभे जशी फांतमा!' २६४

दुसरा मग चर्चेत मिसळतो
आणि म्हणें, 'ती रे! अभ्यंकर!
बाप तिचा तो पठाण कादर?'
"जिम्खान्या' वरची ती! बरं! बरं!'
तिसरा त्याला पुष्टी देतो २६५

त्यांवर बघतां कुणि रागानें
भज्यासारखे डोळे करुनी
'कां हो ! हे कां ? चिडले मौनी ?'
विचारीत त्यांवर घसरोनी
नेत्र शक्य तों करुनी काणे ! २६६

पहिला फुणगी देतो टाकुनि
'असेल बसलें प्रेम तिच्यावर'
कोटिक्रम करि दुसरा यांवर
'बंधुभगिनिचें नातें !' 'हो तर !'
सांथ मिळे त्यां कोंपऱ्यांतुनी २६७

वाऱ्यावरल्या हिडिस कल्पना
कुणीं त्यांकडे नाक मुरडती
कुणि नुसते माना डोलावति
कुणि हास्यानें देति सम्मती
विद्यार्थ्यांचे प्रकार नाना २६८

हळूं हळूं जमती चौघेजण
जिन्नस येती तसे सम्पती
रुपया दो रुपयांचें खाती
सिगारेटच्या पेट्या फुटती
शान्त होतसें मग संभाषण ! २६९

चार वाजतां घेउन पुस्तक
जो तो निघतो ऐटित मारे
हास्याचे उडवीत फवारे
सांथ देत तळणीचे झारे
दिसें मोकळें 'काफे यूनिक !' २७०

हक्काची रविवारीं सुट्टी !
नातलगांना कुणी भेटती
कुणि पत्त्यांचे डाव टाकिती
तसें कुणी 'मॅटिनी' साधिती
करिति 'सोवळे' 'चट्टीपट्टी' २७१

कळण्यां साप्ताहिक आढावा
कॉलेजांतिल अभ्यासाचा
कुणी ध्यास घेतात घराचा
रविवार न चुकतो कधिं त्यांचा
कुठून ठावी मोकळी हवा ? २७२

प्रेमाचा मिळतो न अशांना
बहर लुटाया नवनवतीचा
कळी पाकळीमधिल स्थितिचा
पूर्ण विकसल्या वास फुलाचा
कसा कळावा नासिकेविना ? २७३

रविवारीं जो तो आनंदी
'क्ववांत' कोणी 'बिझिक' खेळती
'एम्प्रेस गार्डन्' वर कुणि फिरती
'बॅंड' वादनीं रमून जाती
विद्यार्थी म्हणजे स्वच्छन्दी ! २७४

त्यांतुन असती कुणी 'सोवळें'
भासविती ते 'भरली थण्डी'
परन्तु अभ्यासाची अण्डीं
घरांत उबवी जणूं कोम्बडी
बाहेरील जगाला मुकले ! २७५

अशासारखे वेगवेगळे
नमुने मिळती पहावयाला
कुणीं विळा तर कुणी भोपळा
बगळा कोठें, कुठें कावळा,
साम्य नसे मग सख्य कोठलें ? २७६

राजा-सोनूची तर दुक्कल
दिसेल रविवारीं बहु तत्पर !
' जसा चांदण्याकरितां आतुर
चकोर पक्षी उंच उडे वर'
तशी काढिती शोधुन शक्कल ! २७७

निमित्त करुनी भेटायाचें,
सोनू तर अपुल्या ताईला
राजा मित्राच्या पाठीला
महिलांच्या तर कॉलेजाला
म्हणुनी जाती, हित दोघांचें ! २७८

युवकांची तर चंचल वृत्तीं !
मोर नाचती मेघ पाहुनी
चंद्रदर्शनीं जशी कमलिनी
' स्वारी ' दिसतां जशी ' स्वामिनी '
तशी स्थिती हो बघतां युवती २७९

या न्यायाला कीं अनुसरण्यां
राजा सोनूनें न चुकावें
यांत नवल कोणतें दिसावें ?
धर्म कळीचा फूल फुलावें !
दोष द्याल कां तुम्हि तारुण्यां ? २८०

कॉलेजांतील खरी मजा जी
मिळे चाखण्यां सुरुवातीला
' टर्म ' कशीबशि भरावयाला
हजर मुलें असतीं ' तासाला '
अभ्यासाला परी न राजी २८१

ज्याच्यात्याच्यावर चढलेली
असते सुट्टीमधील धुन्दी
करून घेती मन आनंदी
कारण सम्पे घरची बन्दी
नवीन येते पुन्हां झळाळी २८२

कॉलेजांतिल निघती ' मान्सुन '
अशाच समयीं फिरावयाला
ठरीव वेळीं जशी कोकिळा
गाण्याकरितां निघे वनाला
नियम निसर्गाचेही ' कॉमन ' ! २८३

' जिम्खान्याची ' कितींक ' खातीं ?
' डिबेटिंग ' वा कुणि ' हॉकीला '
' मॅगेझिन् ' वा ' लायब्ररिला '
धडपडतो जो ' उभा राहिला '
' टेनिस ' किंवा ' क्रिकेट ' साठीं २८४

कुणी म्हणे, ' मी उभाच यन्दा '
कुणी कुणाला हातीं धरिती
उगा चिथावुन कुणांस देती
लढत लावुनी गम्मत बघती
कित्येकांचा हा तर धन्दा ! २८५

विद्यार्थिनिचें मत घेण्यांस्तव,
खटपट असते खूप चालली
ज्याची त्याची तऱ्हा निराळी
बहिणीतर्फे घेती कबुली !
करिती ' कॅन्व्हासिंग ' अवास्तव ! २८६

मत घेण्याला किती खटपटी ?
येतां जातां ' खडीसलामी '
मनीं म्हणें, परि येइल कामीं
भेटी फक्तच त्या हंगामी
कारण ' हांजी ' ' कार्यापुरती '! २८७

' उभा ' असे जो निवडणुकीला
त्याची होते फार टवाळी
कुणी ' धीट ' करितात कुचाळी
' खूणच यांची परकर-चोळी '
' बाशिंगानें बैलच सजला ' ! २८८

' सेक्रेटरि ' जो उभा राहिला
मनीं म्हणे तो पैसे दाबू
जिमखान्याच्या हितां न राबूं
कारण वृत्ती असते ' खाबू '
'सेक्रेटरि'चा 'भाव' वाढला ! २८९

निर्भिड म्हणजे अ. ह. गद्रे
सम्मेलन म्हणजे अधिकारी
' खाबू ' म्हटला कीं ' सेक्रेटरि '
' आज ' समीकरणें ठरणारीं
कशास दावा त्यांचीं छिद्रें ? २९०

उत्सव कीं ‘ वार्षिक सम्मेलन ’ !
एकजुटीनें कामें करणें
मधुनी मधुनी त्यांत भाण्डणें
अखेर परि गोडींत मिटविणें
दूध-साखरेंचें जणुं मिश्रण २९१

कॉलेजांतिल विद्यार्थ्यांच्या
उत्साहाला फुटतें उकळी
खुलते ‘ विश्वच ’ वर्षाकाळीं !
परि येती कुणि धरुन धावळी
आवेशानें अहिताग्नीच्या ! २९२

‘ सम्मेलन म्हणजे सहभोजन ’
याविषयीं दावून अनादर
तुटून पडती सुधारकांवर !
चातुर्वर्ण्य, नि ब्राह्मण्यावर
प्रसंग येतो अखेर दारुण ! २९३

कुणी चाहते मिष्टान्नाचे !
म्हणती, ‘ करणें यन्दा जिलबी ’ !
भाजी करि कुणि पसन्त, कोबी !
बेत बदलती, नाना सबबी !
सम्मेलन साधन मौजेचें २९४

सम्मेलन म्हटलें कीं ‘ गम्मत ’ !
अध्यापक छात्रांत मिसळती
विद्यार्थिनि वाढाया घेती
बन्धुभगिनिचीं कारण नातीं
उठते ‘ ढेकर ’ देउन पङ्गत ! २९५

कुणी मराठी, कुणी कानडी,
उर्दू कोणी, कुणि गुजराथी !
वादविवादें पिकतीं माथीं
नाटक रङ्गे परी मराठी !
कारण त्यांची असे अघाडी २९६

कुणी म्हणे, 'घ्याच भावबन्धन'
कुणी म्हणें, 'छेः ! एकच प्याला'
तयार नसती कुणि कामाला
'यन्दा मग काढावा मेळा'
सुचवी चेष्टेनें कुणि त्यांतुन ! २९७

अखेर सम्पुनि वाटाघाटी
निवड नटनटींची मग होते
पुढे यावयां सन्धी मिळते !
नाटक नवलाईनें बसते !
विद्यार्थिनि परि 'पार्ट' न घेती ! २९८

कितीक तर म्हणती यासाठीं,
बरोबरीनें शिक्षण घेणें
रोज नवनवे नखरे करणें
अशा ठिकाणीं मागे सरणें
'मुली दक्षिणी'! ही अडकाठी ! २९९

'सम्मेलन' जाईल सम्पुनी !
परी, चघळतां कडक रेवडी
जशी टिकविता येते गोडी,
तशा त्यांतल्या 'प्रसङ्ग पकडी'
मागाहुन घेती मन ओढुनि ३००

अधुनी मधुनी पाउस येणें
नन्तर थोडी पडे उघाडी
मैदानांवर मिसृड जाडी
दिसते कारण हवा कोरडी
क्रिकेटचे भरतात सामने  ३०१

कॉलेजांतिल क्रिकेट-दर्दी
या 'सीझन्‌ला' येत अघाडीं
प्रसन्नता अङ्गांत घे उडी
'कबूतरें' सोडती 'खुराडीं'
'मॅच' पहाण्यां चिकार गर्दी  ३०२

'फेल्ट' 'हॅट' कलती डोक्यांवर
'फ्लेक्स' बूट अन् 'पॅन्ट' पांढरी
शर्टाच्या तर 'स्पोर्ट' 'कॉलरी'
अङ्गामध्यें कोट 'ब्लेझरी'
'क्रेस्ट' मख्मली रुळतो त्यांवर  ३०३

ठरलेला हा वेष रुबाबी,
खेळाडूंचा नित्य असावा
भाडोत्री परि आणुन ल्यावा
'इन्वेटिंग्' मध्यें बारावा
गडी परन्तू दिसे न 'श्याबी'!  ३०४

'टेन्टा'मध्यें बसती येउन
मुली दक्षिणी आणि पारशी
द्राक्षरसाच्या भरल्या पेशी
मनुक त्यांत दिसते इवलीशीं
मधेंच तैशी काळी 'खिश्चन'!  ३०५

कुणांस कुठली 'मॅच' होतसे,
या विषयांवर धूळ उडाली
मैदानांवर 'मॅच' चालली
कुणां कुणांवर फिरेल पाळी
कारण तेथें स्पष्ट खुलासे! ३०६

कुणी म्हणे, ती 'डर्बी', 'गोवा'
नशिबाची तर असे 'लॉटरी'
कुणांस दिसते 'दुर्री, तिर्री'
वदे, नको ती तिकडे 'तिसरी'
जरा तापतां उधळे ओवा? ३०७

यू. टी. सी. कुणि म्हणे 'कम्पनी'
दुसरा त्याला पुस्ती जोडी
'कलमी आंब्याच्या तर फोडी'
वदेल तिसरा, 'चिकणी', 'बर्डी'
मधेंच लावुन दुर्बिण नयनीं ३०८

नजर टाकतां, दृश्य मनोहर
माशीपासुन गोड मिठाई
जशी झांकितो कुणि हलवाई
तशीच पार्शी रमणी घेई
जाळिदार बुरखा तोन्डावर? ३०९

'बाउन्ड्री' वर 'बॉल' थोपवुन
राजा भावे उभा राहिला
तोंच दिसे खुर्चीवर पुढल्या
मेथा माणिक हंसरी त्याला
फुटूं लागती 'सोडा लेमन'! ३१०

भिन्त कुडाची चौंबाजूला !
कसेंबसें खोपटें झांकणें
घरच्या भाताच्या पेंढ्यानें
रङ्ग रोजचा ! हो सारवणें
कोकणांतला खुले बङ्गला ! ३११

गुरें मोकळीं दिवसभराला
सन्ध्याकाळीं पण भरलेला
दिसेल गोठा घुंगरलेला
धारा निघण्याच्या वेळेला
हुंकारानें मिळे हवाला ३१२

परसांमध्यें खळ अळवांचे,
अङ्गणांत माण्डव वाटोळा
वरती लोंब्या वाळवणाला
घरांपुढें ओटा ठरलेला
उखळ त्यांत बहुधा दगडाचे ! ३१३

शिवारांतल्या माळा जवळुन
वळणांवरती थाम्बुन थोडा
पुढें खळाळत वाहे ओढा
पाण्यांस्तव हो काधि न ओरडा
कमेटिचे नळ कृपण न कारण ! ३१४

पाणवठ्याला गुरें गांवचीं,
ओढ लागुनी ओढ्यावरतीं
सकाळसायंकाळीं येती
नन्तर उडवुन खूर शेपटी
घरांस वळतीं फुलतां प्राची ३१५

घागर घेउन कमरेवरतीं
कर डावा त्या वेष्टण देती
शिवाय कळशी दुसऱ्या हातीं
करित मजेनें गप्पागोष्टी
तरुण मुली पाण्याला जाती ३१६

खुल्या दिलें बसती दगडांवर !
पाण्यांमध्यें पाय सोडुनी
घरची कुणि सांगते कहाणी
विचार दुसरी करिते त्यांतुनि
बोट कधीं लागे धक्क्यांवर ! ३१७

बकुळीच्या तर वृक्षांखालीं
ओच्यांच्या परड्या भरभरुनी
नन्तर करिती फुलें-वेंचणी
देवळांत हो दिवे लागणी
घरांस निघती वाटपाउलीं ३१८

घागर हिसळे—लगबग झाली
उरोभाग भिजवी त्यांतिल जल
वारा उडवी वरवर अन्चळ
जणूं खुले चन्द्राभंवती खळ
पुरें यापुढें वर्णनशैली ! ३१९

गगनीं येतां चंद्रकोयरी
उठे नारळी अङ्ग झाडुनी
रात्र किरकिरे रातकिड्यांनीं
फणी सळसळे पाचोळ्यांतुनि
कोंकणांतलें काव्य किती तरि ? ३२०

कौंकणांतले जणुं काजूगर !
अशी असावी शामी वनिता
जरा दूरवर नजर फेंकतां
कॉलेजांतिल माणिक मेथा
दिसते सौन्दर्याचें आगर ३२१

अङ्गलटी शामीची दण्गट !
टन्च जणूं खैराचीं खोडें
पाउल उचली मण जड तोडे
माणिक परि ती सुरुचीं झाडें
कळकींसम पोकळ जणुं मन्गट ? ३२२

आगरांतल्या विहिरीवरती
पाणी शेन्दायांस एकटी
शामीची तनु दिसेल झुलती
लवलवणारी जशी कामटी
बान्धा सुदृढ, निकोप प्रकृति ३२३

क्षणांत डावा, क्षणांत उजवा,
हात हालतां खालीवरती
मुसळाला मिळते तैशी गति
दाणे उखळांतुनी उसळती
अस्फुट हंसते शामी तेव्हां ३२४

भात काण्डतां भरती बाहू !
तर्र ऊर सारखे नाचती
कंकणनादांवर जणुं डुलती
मधेंच पाउल तान्दुळ लोटी
हृदय तिचें पण पवित्र ‘ देहू ’ ! ३२५

दिनचर्येची असे आंखणी !
'पहांटपक्षीं' गाणीं गानीं
इकडे ओंव्या जात्यावरती
रोज पायलीची पडते पिठि
नन्तर असते पेज कढवणीं ३२६

घरचे खवुनी ओले नारळ
सार चहाऐवजीं बनविणें
भाजी परसांतली तोडणें
नन्तर पत्रावळी लावणें
आणि सोलणें पिकलीं पोफळ ३२७

पोषाखाला फारच जपते
कॉलेजांतिल माणिक मेथा
मुम्बईंत ये सुट्टी होतां
पावबिस्किटें ! हा तर नास्ता
दारामध्यें नोकर झुलते ? ३२८

'जुहू' पासुनी 'विलेपार्लें'
दूर न म्हणुनी रोज हिण्डणें
सायकलीवर पाय मारणें
थकुनी थोड्या व्यायामानें
थण्ड पेय मागवी शहाळें ? ३२९

गालांवरचीं नाजुक चिन्हें
पाहुन शामीचा हो हेवा
माणिक-सौन्दर्याचा कावा !
सुका मुम्बईचा तर मेवा
आम्बरसाची रुचि न दे पन्हें ! ३३०

कार्यक्रम करण्यां गमतीचा
‘ वाङ्मय मंडळ ’ कुणि स्थापिती
अथवा कुणि ‘ शारदा-समीती
तशीं कुठें ‘ साहित्य-कमेटी ’
‘ सेक्रेटरि ’ मग नाचायाचा ! ३३१

तोण्डें चालविण्याचें साधन
म्हणुनि ठरविती कुणि व्याख्यानें
‘ मॅगेझिन्‌चे ’ भरति रकानें
साथींला तर काव्यगायनें
अखेर अहवालाचें वाचन ! ३३२

व्याख्यानाला विषय नवनवें !
‘ स्त्रिया आणखी रङ्गभूमिचा ’
वाद सदोदित चालायाचा
‘ संततिनियमन करावयाचा ’
सल्ला देण्यां रं. धो. कर्वे ! ३३३

जसें जवळ सम्मेलन येतें
तसा ऊत ये व्याख्यानाला
‘ स्त्रीच पाहिजे स्त्रीपार्टीला ’
मुद्दा हा घेती चर्चेला
कारण नाटक खरें रङ्गतें ३३४

विद्यार्थी मग कोणी नकल्या
नायक होण्यां निघेल देखा
दुःखाची पण वार्ता ऐका
विद्यार्थिनि कुणि, न हो नायिका
कारण त्यांच्या नुसत्या जिभल्या ! ३३५

मुलीं महाराष्ट्रीय नेहमीं
वादविवादें कडोविकडती
नसे कुणाची परन्तु छाती
जी ती बोले तोण्डापुरतीं
नजर तेवढी असते हुकुमी ! ३३६

असती जेव्हां काव्यगायनें,
' हॉल ' भरें तेव्हां गर्दीनें
फुलती सगळीं अन्तःकरणें
' पुढल्या बाकांवर ' ओळीनें
खुलावयाचीं ' नाजुक कवनें ' ? ३३७

गीत सुरूं हो ' दार वाजलें ' !
' यशवंतांच्या ' गोड गळ्यानें
भरतीं हृदयें प्रीतिरसानें
गीत सम्पतां एक दमानें
शेंगांचीं वाजतीं टरफलें ! ३३८
नंतर येतां ' गिरीश ' पुढतीं

खट्याळ विद्यार्थी ओरडती,
" आली आतां डोङ्गर माती
गाण्यानें कां पिकेल शेती ?
प्रणयाची गा गीतें नुसतीं. " ३३९

' मायदेव ' मग येतां वांकुनि
नकार मिळतो शिशुगीतांना
हळुंच प्रश्न ये " ते गातांना ?
डोईवर हण्डा देतांना "
लगेच संमति मिळे शिट्यांनीं ? ३४०

स्वतन्त्र सगळें मिळतें शिक्षण !
रसिक चार जमती प्रियप्रेमी
प्रीति कराया सन्धी नामी
आणाया एकटें ' असामी ' ?
कॉलेजांतिल ' बोट्क्लब ' साधन ! ३४१

नदीलगतच्या झाडिंत सुन्दर
उभारलेला ' बोट्क्लब ' ऐटित
शान्त बाजुची सृष्टी सोबत
' फ्लॅट ' फळ्यांचा दिसे तरङ्गत
पडलेला जणुं जलशय्येवर ! ३४२

मुळामुठेच्या सङ्गमांवरीं
ओघ सन्थ पाण्याचा असतो
प्रणयिलिलांचा सङ्गम होतो
बोटीमध्यें कारण ' ती, ' ' तो ' ?
निसर्ग भंवती चेतोहारी ? ३४३

लाम्ब परन्तू अरुन्द होडिंत,
सातआठ विद्यार्थी बसुनी
वल्हीं मारती दो हातांनीं
धरीं सुकाणूं कुणि विद्यार्थिनि
निघते जोरानें मग शर्यत ! ३४४

कुणी एकटा ' व्हीप ' घेउनी
सोसाट्यानें मधून जाई
दुसऱ्या बोटिंत दिसतां ' कांहीं '
वल्हें वळवुनी नजीक घेई
देइ सलामी शीळ घालुनी ! ३४५

होडीमध्यें बसावयाला,
कुणीं ओळखीच्या तरुणींना
कुणीं आपल्या नातलगांना
कुणि कॉलेजांतील मुलींना
' गेस्ट ' सांगुनी देति हवाला ! ३४६

कुणीं घेउनी फिरती ' कॅनो '
कारण वल्हवायाला सोपी
वेगानें परि पाणी कापी
जणूं नर्तिका भासे ' मर्फी '
पेटीपेक्षां बरा पियानो ! ३४७

प्रशान्त रात्रींच्या वेळेला,
खालीं पाणी निळें चकाकें
प्रभा चांदण्याची वर फांके
मधें सारखी होडी बिचके
कोण बसे ती वल्हवायाला ? ३४८

असावयाचें तरुण जोडपें,
आंत कुणी ऊर्वशी-पुरुरवा
सौंदर्याचा जणूं माल्पुवा
दृश्य जलीं तें दिसेल तेव्हां,
रोमांचानें नदीहि कांपे ! ३४९

फोनोवरती गाई ' जोशी '
' डोह सङ्गमोत्सुक ' हें गाणें
चालूं होती नयनमीलनें
प्रेमाचीं मग सुरूं भाषणें
प्रियाराधनीं खरें खलाशी ? ३५०

खोलींवरती गप्पागोष्टी
कारण असतें वर्ष ‘ ज्यूनियर् ’
हक्काची मग मजा खरोखर
कुणी त्यांतले होती ‘ मास्तर ’
चढते प्रत्येकाला ऐटी ! ३५१

घरांकडूनी कधीं न चुकतां
वेळेवर ये मासिक वेतन
पुरती यांच्या चैनी त्यांत न
म्हणुन काढिती युक्ती शोधुन
भाव शिकवणीचा हो स्वस्ता ! ३५२

धरुन शिक्षकाचा मग पेशा,
कामापुरता बनून मामा
देत शिक्षणाचा ओनामा
महिन्याकांठीं निघे सिनेमा
फुकट नको माराया माशा ? ३५३

महिन्याकाठीं वरखर्चाला,
दहा, वीस रुपये जरि मिळती
तीस तारखेची येतां मिति
शिल्लक यांच्या कधीं न खातीं
खिशांस ओझें फुकट कशाला ? ३५४

कुणी त्यांत दावी वरकरणीं,
“ खर्च काढण्याचें कीं साधन
शिवाय वर देतो ज्ञानार्जन ! ”
पुढें कराया पण हें कारण
आंत असे ‘ खाजगी ’ शिकवणीं ? ३५५

जिम्खान्यांतिल बंगल्यांवरीं
पेन्शनराच्या कुणां मुलीला
कुणीं जातसें शिकवायाला
मनीं वाटतें पेन्शनरांला
"गरिब बिचारा करिल नोकरी !" ३५६

शिष्या त्यांतुन मिळतां सुन्दर ?
फूल खोंवुनी कोटाला तर,
वेळेच्याही जरा अगोदर
बसेल येउनि नियमित मास्तर ?
घेइल तब्बल तास बरोबर ! ३५७

करडीं ठेवुन नजर दूरवर !
शिष्येचें सौन्दर्य-समीक्षण
करण्यां शिक्षक देई वाचन
हळूं हळूं कळतें तिज लक्षण ?
प्रेमाचे मग धडे परस्पर ? ३५८

अखेर 'ऑर्डर' 'नाजुक' सुटते !
"चहा नको पण कॉफी आणा"
पुढें केशरी दूध 'बयाणा' ?
वरतीं आणिक असे बहाणा
शिष्य-शिक्षकाचें कीं नातें ! ३५९

"आज पाडव्याला या मास्तर,"
भोजनांस मग ये आमंत्रण !
नडे ओळखीला हें शिक्षण ?
पेन्शनरांवर प्रसंग दारुण !
अशी शिकवणी चाले वरवर ! ३६०

डोक्यांवर छे! 'हॅट' घमेलें,
शर्टाचें खरखरीत कापड
अंगावर चढवीलें जोखड
साहेबांचें सजलें माकड
मळभ जणूं कपड्यांवर पडलें! ३६१

'मिलिटरिचा' फेंकुनी दिलेला
जुना 'यूनिफॉर्म' मिळे घालण्यां
पाव देत 'कँपावर' खाण्यां
कामाच्या लाद्तील गोण्या
यू. टी. सी. म्हणणें नांवाला! ३६२

घेईना कुणि ऐकुन सबबीं
वरिष्ठ म्हणजे संकट वाटे
अधिकाराचे हक्कच मोठे
डाळ कुणाची तिथें न शिजते
यू. टी. सी ची निव्वळ 'हॉबी'! ३६३

आज कुणाची 'हॅट' वांकडी,
उद्यां कुणाच्या बुटां न 'पॉलिश,'
कुणी न केली दाढी मालिश
म्हणुन सदा अधिकारी नाखुष
शिस्तींस्तव देतात 'परेडी'? ३६४

यू. टी. सी. च्या नांवाखालीं,
जो, तो, होण्या बघतो सोल्जर
जीवितांत आणाया साखर
झटतो बेडर होउन 'कादर'
सोडीं हळुं हळुं नीती सगळी! ३६५

'पाषाणाला', 'वानवडीला',
कुठें तरी पडतो दरवर्षीं
कॉलेजाचा कँप यू. टि. सी.
विद्यार्थिनिंची निघे 'वार्निशी'?
ऊत जसा ये शिळ्या कढीला! ३६६

कुणी नांव घे लीला दळवी!
"गरा तुकतुके जणुं फणसाचा
किती गोड पिवळा सोन्याचा?
तसा तिच्या विलसे ओठाचा—"
लगेच करुनी काव्य दे कवी? ३६७

दिनचर्या तर 'कँपा' वरतीं
सिगारेटचे 'टीन' ओढणें
'बीर' सारखीं! गुळण्यां करणें
अश्लिल भाषण मुखीं घोळणें
कारण तेथें कुणां न भीती! ३६८

आठ जणांच्या तुकडीवरतीं
'कॉर्पोरल' कुणि नेमुन 'छकडा'?
यू. टी. सी. चा चाले गाडा
जेवणांस पावाचा तुकडा
शिस्तीनें तो वांटुन देती! ३६९

अखेर मिळते कुणांस 'पट्टी'!
हातावरतीं लावायाला
लगेच त्याचा मान वाढला
शोभा येई पोषाखाला
यू. टी. सी. कुठली? ती ऐटी! ३७०

भाद्रपदाचा महिना येतां,
रस्त्यांवरतीं मण्डप घालुनि
पुढें मनोहर सुबक माण्डणी
गजाननाची मूर्त स्थापुनि
करिते उत्सव अपुली जनता ! ३७१

आरासाची उडते दङ्गल !
मेळेवाले बान्धुन फेटे
हातांमध्यें धरून सोटे
जणूं धावते दिसती घोटे
कारण त्यांची असते धांन्दल ! ३७२

मेळेवाले रस्तोरस्तीं,
पोटांवरतीं ढोल बान्धुनी
फुटलेलाही घेती बडवुनि
कुतूहलानें लोक मागुनी
पदें ऐकण्यासाठीं पळती ! ३७३

गजाननाच्या समोर ऐका,
गाण्यामध्यें विषय काय तर ?
कॉलेजांतिल विद्यार्थ्यांवर
तशी मुलींच्या पोषाखांवर
असावयाची बहुधा टीका ? ३७४

आवाजाच्या सगळ्या पट्टया
मेळ्यांमध्यें बघून घ्या तर !
कुणां ताल ना, कुणि खर्जस्वर !
गाती कसले ! नुसतें भेसुर !
कानांमध्यें बसेल दट्टया ३७५

कन्यामेळ्याचा कार्यक्रम,
बघण्यां विद्यार्थ्यांची गर्दी
आंव जणूं गाण्यांतिल दर्दी
" गा हो ! " म्हणतां फुटते सर्दी !
गोम यांतली 'मुली मनोरम !' ३७६

कोण बरे तो बघा हिण्डतो !
गर्दीमध्यें लगट करोनी !
खान्द्यावरतीं कोट टाकुनी
सिगारेटचे 'श्वास' ओढुनी,
कॉलेजांतिल विद्यार्थिच तो ! ३७७

कॉलेजांतिल क्लबांत हल्लीं,
चतुर्थीस मूर्ती गणपतिची
प्रथा निघाली बसवायाची
धुमाकूळ पण घालायाची
सन्धी मिळण्यां ही गुरुकिल्ली ! ३७८

चैनीसाठीं जमे वर्गणी
गाण्याला मग कुणी आणिती ?
" प्रेम चिजा गा ! " म्हणुन साङ्गती
ही तर यांची रोज आरती ?
तत्पर गाण्यां कुणी लावणी ? ३७९

थाटानें मिरवणूक काढून,
ताटांचा लावती चौघडा ?
" मुलांमुलींचा मेळा काढा ! "
अशासारखा करुन ओरडा
पार पडे गणपती-विसर्जन ! ३८०

रोज सिनेमा बघून इकडे,
विचार यांचे प्रगल्भ होती !
उच्चशिक्षणाची त्यां पुष्टी
' फिल्मसिटी ' ये डोळ्यांपुढती
नट होण्याला झुकें पारडें ? ३८१

' होलीवुड् ' विषयीं मग आदर,
आपोंआपच मनीं बाणतो,
' मॉरिस् '-ॲक्टिंग्‌चा तर ' मोटो ' ?
तंत्रपुस्तकें वाचुन बघतो,
लगेच होण्यां कुणि ' डायरेक्टर ' ! ३८२

अमेरिकेचें वाचुन मासिक
भोक्ता होई चित्रपटाचा
अभ्यासूं मग बने कलेचा
विचार करुनी नेपथ्याचा
लिहील कोणी लिखाण मार्मिक ! ३८३

चित्रपटाच्या या वेडानें
कुणी सोडिती अर्धें शिक्षण
नट होण्याची इच्छा, कारण !
कला कशाची बसला घेउन ?
पाश्चिमात्य जें तें अनुसरणें ! ३८४

कारंजांतिल तुषार अथवा,
समुद्रांतली नवीं मासळीं
जशि जोरानें घेते उसळी
तशी पुन्हां ती येते खालीं
कारण पडते निराळी हवा ! ३८५

स्थितीं कांहिंश्या विद्यार्थ्यांची
दिसून बहुधा अशीच येते
तरूण त्यांचें रक्त उसळतें!
'सिनेटोनची' हवा लागते?
ओळख होते कुणा नटीची? ३८६

डोक्यांवर ठेवितील चढवुन
लाम्ब, लाम्ब, काळ्यां केसांना!
अत्यावश्यक गोष्ट नटांना!
हातानें मग सारुन त्यांना
टोपीमध्यें भरातिल कोम्बुन! ३८७

सिनेमांत मग 'स्टार' चमकती!
कुणि स्वतःला म्हणवुन घेती
'बस्टर कीटन' विनोदमूर्ती!
परन्तु भ्रामक अशा समजुती
खोट्या ठरती पड्द्यांवरती! ३८८

मिळतां चित्रपटांस नायिका,
घरंदाज कुणि कुलीन बेटी
उड्या सारख्या म्हणून पडती
चित्रपटाच्या धन्द्यावरतीं
सुशिक्षीत परि तेथें धोका! ३८९

नाट्यकलेची कुठून सेवा?
स्त्रीपुरुषाचें तें सम्मोहन
वरुन दाविती परन्तु शिक्षण!
चाले मूकप्रसङ्ग आंतुन
पार्श्वसङ्गिताचा देखावा! ३९०

खोलीवरतीं राजा भावे,
कृष्णकन्हय्या कुठें गुन्तला ?
पहा नीट निरखुनी खोलिला
दिसेल तेथें युग्म तुम्हाला !
दुसरें 'माणुस' कोण असावें ! ३९१

उशीवरी टेंकुनी कोंपरां
हाताचे डोक्याला टेकण
सैल ताम्बडी सारी वेष्टण
'पोझ' अशी कुणि पहुडे घेउन
उभा कोपऱ्यांशीं 'कॅमेरा' ! ३९२

" अर्धउन्मालित ठेवा नयनां,
माण्डीवरतीं घ्या कर उजवा
मान बाजुला थोडी वळवा
हास्य जरा ओझरतें दावा "
देई राजा मधुन सूचना ! ३९३

'स्टो 'वरच्या पाण्याला अगदीं
फुटूं लागली होती उकळी
जों न चहाची पूड टाकली
तोंच बघा त्या लाली आली
गुपित यांतलें बोला जलदी ! ३९४

छे ! तुम्हां तें कळणें कोठुन !
तरुणांसन्निध येतां नकळे !
तरुणीचें तर हृदय कळवळें !
तोण्डाचें मग मिळतां पेले !
अरुण उगवतो गालांआडुन ! ३९५

हीच ‘ फिल्म ’ त्या खोलीमधल्या
युग्माची तर चालू होती
फोटोच्या निघतांना ‘ प्लेटी ’
हावभाव ते मूक चालती
कारण बाजुंस दुसऱ्या खोल्या ! ३९६

“ माणिक माझ्या मनूची मलका ”
राजाचा रेडिओ बोलला !
तोंच म्हणाली माणिक त्याला,
“ मिस्टर भावे; चहा निवाला ”
प्रीतीची ये खालीं उल्का ! ३९७

त्यांच क्षणाला दार उघडुनी
कुणि म्हातारा उभा ठाकला
दृष्टी वळतां राजा भ्याला
मनीं मात्र इतुकें पुटपुटला,
“ पार्सल आलें कोंकणांतुनी ” ? ३९८

राजा शरमुन जसा लाजला
माणिकचा तों चढला पारा
आंवरतां घेतला पिसारा ?
जातांना मग दावुन तोरा
तुच्छ त्यांकडे बाण फेंकला ! ३९९

राजाला कळला ‘ स्त्री-महिमा ’ !
दृश्य पुढें मग सर्व पातलें
प्राप्त कण्ठणें कोंकणांतले
शामीसह तें जिणें मङ्गळें
कारण राजाचे ते मामा ! ४००

‘ प्रॅक्टीकल्‌चा ’ ‘तास’ चुकवुनी,
बाबू साने घरीं निघाला
वेळ काढण्यां जरा वळविला
पाय कालव्याच्या बाजूला
राजकुंवर तों आली पुढुनीं ! ४०१

सामोरा तिज गेला बाबू,
तोण्डावरतीं हास्य आणुनी
“ कुठें चालला तास चुकवुनी ? ”
तिनें हटकिलें हस्तांदोलनिं
हात वाटलें कितीक दाबूं ? ४०२

बाबूच्या तों हातांमधुनी
सर्व पुस्तकें तिनें घेतलीं
पुढें उघडुन जरा चाळलीं
खोडसाळ मग हांसुन वदली,
“ ‘नोट्स’ यांतल्या जातें घेउनि ! ” ४०३

बाबूचा मग धीर चेपला
उद्देशुन तो तिजला वदला,
“ चला कालव्याच्या कांठाला
प्रीतीला द्या तेथें उजळा ?
खुल्या दिलाचा घ्या निर्वाळा ! ” ४०४

राजकुंवरचें वळलें पाउल
बाबूची तिज आज्ञा रुचली
निम्ब तरूच्या छायेखालीं
शेजारीं शेजारीं बसलीं
निश्वासांची फक्तच चाहुल ! ४०५

" झुगारुनी दे रूढी-ओढणी,
हृदयाचें वघ माझ्या देउळ
मूर्ती तेथें तुझीच राहिल
ब्राह्मण-रजपुत विवाह होइल "
बाबूनें घातली मागणी ! ४०६

बाबू आर्जव करीत होता,
" वडिल सुधारक माझे असती
मला न त्यांची मुळींच भीती
नजर टाक ती क्षितिजांवरती
रङ्ग तेथला नसतो खोटा ! " ४०७

सर्दाराची रजपुत बेटी !
तिचे अश्रुनें भरले लोचन
कण्ठ खरोखर आला दाटुन
जातीची अडकाठी कारण
वडिलांची मग कुठुन सम्मती ! ४०८

वडिलांना तर कृतज्ञ असणें,
मनीं परी बाबूला वरणें
जनीं परन्तू अलग राहणें
कसें सोसणें स्त्रीजातीनें ?
हृदयांमध्यें प्रेम कोंण्डणें ! ४०९

" असो प्रकृतीला सांभाळा,
करील कोणी तुमची सेवा
मत्प्रेमाचा देतें मेवा
गोडी याची जपून ठेवा ! "
तिनें शेवटीं समेट केला ? ४१०

‘ टिळक-तलावाच्या ’ बाजूनें
सोनूनें जों ‘ शॉट ’ मारिला
चम्पेनें तो परत लाविला
आतां सोनू बरीक फसला
अपयश पदरीं ये पहिल्यानें ! ४११

अखेर करुनी हस्तांदोलन
हलवुन विजयी ‘ रॅकेटीला ’
प्रतिस्पर्धि जो निघून गेला
सोनूला तो धक्का बसला
सांवरिलें कुणि देउन ‘ लेमन ’ ! ४१२

सोनू येतां मग शुद्धीवर
‘ टेनिस कोर्टी ’वरती नसुनी
खोलिंत आहों ! आलें दिसुनी !
कपाळ चेपित बसले कोणी !
हात मऊ ! छे ! ‘ कोलनवॉटर ’ ! ४१३

समोरच्या आरशांआतली
उशालगत वांकुन बसलेली
डोळे पाण्यानें भरलेली
मूर्ती चम्पेची जों दिसली
तों सोनूला वाचा फुटली ४१४

“ बैस अशी त्या खुर्चीवरतीं
प्रसंग मागिल स्मरतो कां तुज ?
कोणी केली तेव्हां कुजबुज ?
“ तोलुन बाहूमध्यें घ्या मज ”
आज होउं दे पुनरावृत्ती ! ४१५

" बोलायाचें मुळीं न अगदीं,
स्वस्थ झोंप घ्या थोडीशीं तरि
आधीं घ्या बघु चहा लौकरीं
येइल नंतर तुम्हां हुषारी "
तिनें रागवुन म्हटली नान्दीं ! ४१६

बोलायाचे सोनू घे श्रम !
" तुझ्या हातचा चहा पिण्यानें
रोज घडूं दे मला जाग्रणें
जन्मभरीं उघड्या डोळ्यानें
मजसन्निध तुज पाहिन कायम ! " ४१७

" नका असें कधिं बोलूं फिरुनीं
आईबाबांच्या तर मागुन
भावण्डांचें करणें पोषण
जबाबदारी मजवर दारुण
अतां न होणें मजला गृहिणी ! " ४१८

" कुठे तरी शिकवणी लावणें
अथवा परिचारिका राहणें
मंगळसूत्राचें मज लेणें
नको यापुढें कधींच घेणें
गळ्यांत ' स्टेथॉस्कोप ' घालणें ! " ४१९

" कॉलेजांतिल ' मिठ्ठा राघू, '
नको ऐकवूं ते मधुरस्वन !
बदली जातांना त्यां सोडुन,
मला जायची अगदीं विसरुन
मजसाठीं घुबडांचे घू घू ! " ४२०

औदासीन्य मनांतिल जाण्यां,
राजा गेला ‘ शो ’ बघण्याला
‘ वेस्टेण्ड् ’ त्यांतुन ‘ मॅटीनीला ’
रसिक पाहण्यां होती गोळा
युवती गोऱ्यापान साबण्या ! ४२१

राजाचें चाललें परीक्षण
आजूबाजुंस वळवुन दृष्टी
पार मागच्या खुर्चींवरती
खिळली त्याची सगळी शक्ती
माणिक मेथाचें आकर्षण ! ४२२

‘ सीन ’ त्यांस परि दिसला भलता !
‘ आर्मी ’ मधला गोरा वानर
तोण्ड ! जणूं करपटलीं खङ्गर !
माणिकच्या शेजारीं सोल्जर
मर्कटचेष्टा करीत होता ! ४२३

त्यानें तिजवर केली ‘ फेवर ’ !
‘ सिगार ’ ओढायाला दिधली
‘ नेव्ही ब्ल्यू ’ वर पुरी भाळली
माणिक मोठ्यानें मग हंसली
‘ पेग व्हिस्किचा ’ ये ओठांवर ! ४२४

माणिक नव्हती शुद्धीवरती
असें पाहुनी केला हल्ला
‘ मनीबॅग ’ वर मारुन डल्ला
मधेंच सोल्जर पळून गेला
‘ इन्टर्व्हल्ची ’ आली पाटी ! ४२५

खुर्चीमध्यें कलण्डलेली
माणिकची तनु आली दिसुनी
एकटीच तिज तशी पाहुनी
राजा उठला जागेवरुनी
उचलुनि त्यानें तिजला नेली ! ४२६

मदिरेची जशि गुङ्गी उतरे
तशी ठिकाणांवरतीं आली
डोळे चोळुन माणिक उठली
राजाची पण पाहुन खोली
वदे प्यायल्यांसम तें वारे ! ४२७

" पैशासाठीं माझें लाघव !
कोणाचा मजवर ना तावा
झुगारिलें मी आईबाबा
तुमच्यासम मज नको ' होयवा '
ओझ्यांपुरतें केलें गाढव " ! ४२८

" नका बघूं मजकडे ! या खुदा !
मामा तुमचे येतां धांवुनि
खोलींतुनि मग द्याल हांकुनी
पुरें न हो कां शोभा अजुनी !
प्रेमाची ही वाइट बाधा " ! ४२९

असें बोलुनी, माणिक मेथा
गेली हांसुनि उपहासानें
राजा बसला खिन्न मनानें
कोंकणांतलें दिसे चान्दणें !
खामी तेथें पवित्र गाथा ! ४३०

छडा घड्याळाचा सोनेरी
        रुळे मधोंमध जाकीटांवर
        फूल खोविलेलें कोटावर
        कोण खेळतें त्याच्याशीं तर ?
भक्ष्यांस्तव हो गोळा घारीं ! ४३१

प्रोफेसर ते पहा माधवन्
        सर्वांशीं बोलती हांसुनी
        'डिफिकल्टीचें' सोङ्ग आणुनी
        जमती पुष्कळशा विद्यार्थिनि
कुणि सारङ्गी, कुणि 'व्हायोलिन्' ! ४३२

तरुण त्यांतुनी मुद्रा हंसरी
        काव्याची नित मुखांत भाषा
        साहेबाचा कायम पेशा
        मन्दाराणी सम त्या माशा
म्हणुन चिकटती ! "व्हेरी सॉरी ?" ४३३

असाच एके दिवशीं राजा
        घरीं, माधवन् बघून गेला
        पुस्तक कसलें मागायाला
        पुढें चहाचा पेला आला
शिवाय होता बशींत सान्जा ! ४३४

आणि माधवन्–मन्दाराणी
        आग्रह त्याला करीत होती
        राजाची तों थिजली शक्ती
        पाहुन जोडा ब्राह्मण–खिस्ती
राजा उठला निरोप घेउनि ! ४३५

मन्दा वदली, " ओ ! माय् डार्लिंग् !
हवेंत आहे आज उकाडा
तयार करुं कां व्हिस्की सोडा !
फार नको पण घ्यावा थोडा
लगेच होइल थण्ड दार्जिलिंग् " ४३६

घशांखालती जातां मदिरा
त्यांच्या तोण्डीं ती बडबडली,
" राजा प्रियकर एकेवेळीं
आज परन्तू माझी पाळी
उद्यां आणाशिल कुणीहि तिसरा " ! ४३७

हात ठेवुनी झाणिं तोण्डांवर,
मन्दा बिलगुन त्यांना वदली,
" डियर तुम्ही मज उगा छेडलीं
कुठें धोतरा, कुठें सायली ?
माझ्या प्रेमाचे प्रोफेसर ! " ४३८

" रजिस्टरानें बन्धन कायम,
करुनी टाकूं ! " वदली त्याला,
" या पुढती उपमा जोडीला,
मम पत्राला जोडुन दिधला
तुम्ही म्हणजे ' ताजा कॉलम ' ! " ४३९

वधूवरांना सुख दे ' येशू '
कोचांमध्यें तुझीं लेकुरें
पहा काय करितात तीं बरें ?
प्रणयीं वेडीं दोन कोकरें !
नका कुणी बघुं तिकडे शुः शुः ! ४४०

प्रीतीची सम्पून प्रतीक्षा
कॉलेजांतिल मुलांत खळबळ
कोणांस्तव कीं उठलें वादळ ?
चला पाहुं या कारण त्यांतिल
आली, आली, जवळ परीक्षा ! ४४१

सुरूं जाहलें ' स्टोचें ' ' गाणें ' !
कितीक त्याच्या तालावरतीं
चहा पितांना ' नोट्स ' घोकती
कुणी कुणी डोक्यांवर घेती
वसतिगृह जणुं अभ्यासानें ! ४४२

मशीदी पुढें येतां सगळीं,
वाद्यें जैशीं बन्द राहतीं
परीक्षा तशी येतां पुढतीं
' फिडिल ', अल्गुजें, आणिक पेटी
कोपऱ्यांमधें स्वस्थ पहुडली ! ४४३

' जिम्खाना ' तर पडे उताणा !
कारण तिकडे कुणि न ढुंकती
' क्लबांत ' ताटावर हे बसती
परन्तु पुस्तक पुढें ठेवती
मिळतो फांटा मग गप्पांना ! ४४४

पत्त्यांचे तर उठती अड्डे
' तास ' बुडवुनी कॉलेजांतिल
कुठेंतरी मग जाउन बसतिल
घोकघोकुनीं घसा फोडतिल
अभ्यासांतिल बुजण्यां खड्डे ! ४४५

कुणी आणुनी चिठ्या चपाट्या,
'डिफिकल्टी'स्तव थोड्याशा तर
बघती मुद्दामच 'प्रोफेसर'
मुख्य परन्तू कळण्या पेपर
घरीं सारख्या चालू खेट्या ! ४४६

पुसतो हाल न कुणी कुणाचे !
जो, तो, अपुल्या अभ्यासांतें
मग्न जाहलासे तर वाटे !
चुकुन घराला कधीं न जातें
पैशाविरहित पत्र मुलाचें ! ४४७

सिनेमावरीं ये गण्डान्तर
कारण तिकडे कुणि न फिरकती
दाढी यांस्तव कुणि न घोटती
'पास' अक्षरें डोळयांपुढतीं,
असतां कुठुनी चैन अवान्तर ? ४४८

रात्रीं झालें जाग्रण त्याची,
डोळ्यामध्यें होती लाली
चौकट चेहेऱ्याची सुकली
विद्यार्थिनि ती कुणांस वदली,
"पदवी यन्दा नापासाची !" ४४९

कित्येकींना सुटुन कांपरें
हींव परिक्षेचें ये भरुनी
घाम सुटे मग नसांनसांतुनि
चळद पुस्तकांची देखोनी
डोहाळे करितात साजरे ? ४५०

जशी परीक्षा सर्व सम्पली,
तशी पटापट घरीं चालली
कॉलेजांतिल छात्रमण्डळी
परन्तु इकडे टूम निघाली
चहा पिण्याची तलफ आली ? ४५१

मित्रांमध्यें वाद चालला,
" परीक्षेमुळें शिणली काया
दूर कुठें तरि चहा प्यावयां
मोटारीनें चला जाउं या
घाटावरती खण्डाळ्याला ! " ४५२

मित्रांचें मग त्रिकुट निघालें !
गाडी हांकित होता भावे
लिहीत बसला बाबू काव्यें
शिवाय मागें सोनू कर्वे
आरामानें वाचित ' शेले ' ! ४५३

वेग वाढवुन राजा वदला,
" पेपर माझे वाइट गेले
पुढल्या वर्षीं बसणें ठरलें "
सोनूनें आश्वासन दिधलें
भिऊं नको मी तुझ्या जोडिला ! ४५४

हांसत खेळत प्रवास चाले
मोटारीचा वेग वाढला
पुढें खेडवळ कुणिसा आला
राजानें तों ' ब्रेक ' दाबला
मोटारीचें चाक घसरलें ! ४५५

शेतामध्यें गाडी पडली !
राजा भावे, बाबू साने
आदळले, उडुनी जोरानें
कहर उडाला अपघातानें
सोनू गवसे गाडीखालीं ! ४५६

जमली खेड्यांतली मण्डळी
त्यांच्या मदतीनें राजानें
सावध केला बाबू साने
नन्तर सोनूची एकानें
डोक्यावरची जखम बान्धली ४५७

मोटारीची मोट जाहली ?
आणि चहाची हौस निघाली ?
अपघातानें जाणिव दिधली
' केस ' सोनुची कारण झाली
मरणाच्या पन्थाला गेली ! ४५८

नजिक गांवच्या इस्पितळातें,
घेउन गेले ते सोनूला
उपाय डाक्टरनीं बहु केला
' नर्स ' मिळाली शुश्रूषेला !
जीव मिळाले जिवाजिवांतें ? ४५९

" कोणं नर्स ही?-चम्पा मोने ! "
ओळखिलें राजानें तिजला
सोनूचा पण प्राण निमाला ?
हृद्रोगी चम्पेचा गेला !
भेट शेवटीं अपघातानें ! ४६०

सुट्टीच्या मिळतात सवलती ?
    विद्यार्थी कुणि घेती मागुन
    ‘ रेल्वे ’ चें अर्धें ‘ कन्सेशन ’
    बिलें ‘ क्लबाची ’ जाती चुकवुन
कारण पैसे खलास होती ? ४६१

विद्यार्थी करितात शिताफी !
    अर्ज रजेचा करुनी सादर
    जाणें सुट्टीच्याहि अगोदर
    येणें उशिरा सुट्टीनन्तर
‘ सॉरी ’ वदतां होते माफी ! ४६२

देशाला निघती गुजराथी !
    कुणी मजेनें ‘ टूर ’ काढिती
    वडिल कुणां बोलावुन घेती
    घाईनें तर लग्नासाठीं
बसत अक्षता कोणां माथीं ४६३

सुट्टी होतां जो तो निघतो
    साज खोलिचा खालीं उतरुनि
    कसेंबसें सामान बान्धुनी
    खुर्ची, टेबल परत करोनी
भाडें त्याचें कुणि चुकवीतो ! ४६४

विद्यार्थ्यांचें म्हणून सहसा,
    गळ्यांत घेई कुणी न लफडें
    आगाऊ घे मालक भाडें
    काय तेंच तें वाचा पाढे !
कसा ठेवणें कुणी भरंवसा ? ४६५

बन्द निरनिराळे ' क्लब ' होती !
उरलेले मग पैसे खर्चुनि
' फीस्ट ' शेवटीं मोठी करुनी
' सेक्रेटरि ' करि ' तोण्डमिळवणी ' ?
जमा खिशाच्या बहुधा खातीं ! ४६६

ताट आणखी ठेवुन वाटी
फोटोंचे मग ' ग्रूप ' काढती
आठवणी कायमच्या करिती
क्लबांत लावुन ' कॉपी ' मोठी
स्मारक मागें जणूं ठेवती ! ४६७

कॉलेजांतिल चालूं शिक्षण,
असतां इकडे सून आणिती
मिळवुन मुलगी पैशावरती
विवाह करुनी वडील देती
वेळ घालवायाचें साधन ! ४६८

घरांकडे जाण्याची घाई
असल्या विद्यार्थ्यांना होते
लगेच कारण पाकिट येतें
वाट पाहुनी पत्नी लिहिते
" अजुन यायचें कसें न बाई ? " ४६९

काळजींत कुणि होतां सुट्टी
वडिलांना घरिं काय सांगणें ?
हिशोब आतां कुठून देणें ?
मुक्कामां परि प्राप्त पोंचणें
गाडी हलते देउन शिट्टी ! ४७०

सोनूच्या मृत्यूनें राजा
उदास अगदीं होता झाला
सखा सोबती सोडुन गेला
कोण यापुढें बरोबरीला
अभ्यासाचा घेण्यां बोजा ? ४७१

म्हणून सुट्टी झाल्यावरती
कोंकणांत तो तडक निघाला
सलाम केला कॉलेजाला
शामीचा लागला जिव्हाळा
बरी वाटली बघणें शेती !... ४७२

शिवाय मामांची इतराजी
त्याच्या वरती होती झाली
उपाय म्हणुनी युक्ती सुचली
शामीला मागणी घातली
मामी झाल्या लगेच राजी ! ४७३

समोर राजा दिसतां शामी
घरांत आतां पळूं लागली
परिस्थिती कारण पालटली
वयमानाची पडे सांवली
वडिल माणसें मामा मामी ! ४७४

राजाची मिळतांच संमती
लग्नाची हो सुरू तयारी
सजली पुढची तशी ओसरी
निमंत्रणाची झाली जारी
एकेकांची सुटे वळकटी ! ४७५

बोहल्यांवरी अखेर चढुनी
लग्नाला तो उभा राहिला
वधूवरांच्या हातीं माळा
शास्त्रविधीनें विवाह झाला
'सावधान' सारखें गर्जुनी ! ४७६

शेतीवाडी जतन कराया
मामा देती त्याची त्याला
कारण त्याच्या आयुष्याला
आजपासुनी मुहूर्त झाला
संसाराची पडली छाया ! ४७७

शामी आतां राजासाठीं,
कुठें घाल गुण्ड्या 'शर्टा' ला
पाणी उपसुन दे स्नानाला
देउन ये कॉफीचा पेला
निमित्त काढुन घेई भेटी ! ४७८

शामीची ती सोज्वळ भक्ती
पाहुन राजाचें मन रमलें
कॉलेजांतिल चित्त उडालें
पास परिक्षेंत न तो कळलें
शामीची जडली आसक्ती ! ४७९

प्रसङ्ग एकाद्या जर वेळीं
स्मरूं लागले मागिल त्याला
कोंकणांतुनी कॉलेजाला
कापी अन्तर समुद्र मधला
आणि सोनुची मूर्ती कवळीं ! ४८०

बाबू साने बी. ए. झाला
तशी नोकरी आलें बघणें
कारण घरचें कांहिं न येणें
प्राप्त त्यांमुळें आलें मुकणें
आज रम्य त्या कॉलेजाला ४८१

प्रसङ्ग मागिल उभे राहिले
सोडुन जातां कॉलेजाला
कारण होता जीव अडकला !
आनन्दी त्या आयुष्याला
वळण पुढें लागणें निराळें ! ४८२

बाबूचा ये दाटुनी गळा
डोळे पाण्यानें डबडबले
कारण त्याला दिसुनी आलें
जिणें आजचें आणि मागलें
फरक त्यांतला मग जाणवला ! ४८३

शिवाय आला विचार दुसरा,
'सुखी असे तो राजा तिकडे
सोनू स्वर्गामध्यें पहुडे
उदेपुरांहुन येत न काढें'
होळीला कां सजेल दसरा ? ४८४

कॉलेजांतिल बागेमधल्या
कारन्जांवर जाउन बसला
तुषार तिथले परि हृदयाला
करुनी देती पटपट गोळा
गोष्टींचा इतिहास मागल्यां ४८५

## निरोप घेतांना !

‘ एकेकाळीं आपण येथें
राजकुंवरला दिधलें आणुन
उन्चावरलें फूलच तोडुन
तेव्हां वदली अस्फुट हांसुन,
“ हळूंच ! ना तर रुततिल काटें ” ४८६

किती तिचें तें प्रेम मजवरी !
बापानें परि केला सवदा !
धर्माचा जातिचा कायदा
प्रेम कधीं पाळितें कां कदा ?
काय ती तरी करिल विचारी ? ४८७

प्रेम करायां इथेंच शिकलों
प्रेम विसरण्यां इथेंच आलों
वादविवादें जेथ गुङ्गलों
निरोप घेण्यां तेंथच आलों
कारण एकाकीं मी झालों ! ’ ४८८

‘ जिम्खाना ’ तर त्या बाजूला
‘ टेनिसकोर्टी ’ वरी मागल्या
हळूं हळूं तर पडूं लागल्या
निराश काळ्या जणूं सांवल्या
सातांचा तों पडला टोला ४८९

तन्द्री मधुनी जागा झाला
आणि आक्रमीं बाबू रस्ता
तास घुमत तो अजून होता
पुन्हां एकदां मागें बघतां
राहुन राहुन कितीक रडला ! ४९०

५०
५८.९८

कॉलेजांतिल ' विश्व ' निराळें ?
पैशाचा उडवून उन्हाळा !
अभ्यासाचा थिजुन हिंवाळा !
पडुन परिक्षेंत पावसाळा !
विद्यार्थ्यांनीं धडे घेतले ! ४९१

शिक्षण द्यावें अमेरिकेनें
' तरुणींची काढण्यांत खोडी
येते चित्रपटाला गोडी !
खोकल्यांवरी जशी कोर्फडी
ढांस लागतां चुम्बन घेणें ? ' ४९२

घातुक असलें तत्व देखुनी
विचार यांच्या मनां न शिवला
नविन माल हा ' शोकेस ' मधला
दुरून वरच्या बघुन ' लेबलां '
पाय काढता घ्यावा तिथुनी ! ४९३

राहणींतही बघाल कायम
नवाब अस्सल जणूं निजामी !
प्रेमामध्यें ' लाल ' बदामी !
परन्तु शक्तीनें कुचकामीं !
उत्तरेंतली पुरुषी बेगम ४९४

विश्वांवरल्या अक्षांशाची,
कॉलेजांतिल विद्यार्थ्यांना,
रेखांशाची तशी मुलींना
उपमा दिधली जर दोघांना
ओढ असे मग अज्ञाताची ? ४९५

शीत ऊष्ण विश्वांवर पट्टे !
विषुववृत्तांजवळ ऊष्णता
ध्रुव टोकांना साफ गारठा
प्रीतीमध्यें असाच मोठा
फरक आढळें कोठें कोठें ? ४९६

कॉलेजांतिल दृश्यें सगळीं
लिहिलीं गेलि न तोळा मासा
शुभ्रपणा लोण्याचा जैसा
कधीं न उतरे तुपांत तैसा !
त्यांतुन माझी कृतीच पहिली ! ४९७

कुठलीही घ्या कुणीं लेखणीं !
किरटें किंवा कोरिव अक्षर
असतें अवलम्बुन हातावर
फक्त दृष्टिला रुचतें ' सुन्दर '
बघे कुरूपहि वधू देखणी ? ४९८

प्रतिभा ईश्वरदत्त देणगी !
उणे, आधिक, तर कुणां भागिले,
पूर्ण, कुणां वा, दशांश, गुणिलें,
प्रमाणांत वाट्याला आलें ?
घाल टाकुनी तरीहि ' ठिणगी ' ! ४९९

ना तर देइल ' पांच ' ' केसरी ' !
' त्रिकाळ ' काढिल ' चर्चा, चिमटे ' !
अथवा ' भाला ' मोडिल बोटें ?
वा ' आलमगिर ' मारिल सोटे !
' सकाळ ' घेइल ' छोटि हजेरी ' ! ५००



[library stamp] ६७३६

## ‘ कवीचें स्वगत ? ’

( ‘ झेण्डूनें ’ तर सीमोल्लंघन !
केलें काव्यप्रान्तीं देखा !
जाडजूड कवितेचा तेखा,
सरला येतां ही नव शाखा
जाड्यावरतीं करणें लंघन ? )

**Q. E. D.**

REFBK-0005767
REFBK-0005767

## गादीवर बसून फटाके उडवा !

**वि. मा. दी. पटवर्धन** यांचा विनोदी

— टीकालेख-संग्रह —

# साहित्य गुदाम

दिवाळींत प्रसिद्ध झाला. आतां लहान मुलें फटाके उडवूं लागलीं कीं, त्यांच्याकडे पहात वाईट तोंड करून बसण्याचें कारण नाहीं.

**मॉडर्न बुक-डेपो, हुजूरपागेजवळ, पुणें २.**

नवीन सामाजिक कादंबरी

# सौ. मालती

कि. १। रुपाया.

ले.—गं. भा. निरंतर एम. ए.

एका चंचल प्रवृत्तीच्या विवाहित स्त्रीचें आयुष्य रेखाटून घराबाहेर पडून पुन्हां संसारांत कशी स्थिर झाली तें लेखकानें चित्रिलें आहे.

---

# माझे उच्छ्वास

कि. १ रु.

लेखक—नाथ—पुणें—

कळ्यांचे निश्वास वाचून हे उच्छ्वास टाकण्याची लेखकास स्फुर्ति झाली इतकें सांगितलें म्हणजे आणखी वर्णन नको.

# सात रुपयांत सात पुस्तकें घरपा

— फक्त मनीआर्डरीनेंच मागवा —

## लेखक—'दिवाकर कृष्ण'

| | | |
|---|---|---|
| १. | किशोरीचें हृदय—'दिवाकर कृष्ण'. | १-८-० |
| २. | संगीत तोड ही माळ नाटक ... | १-०-० |
| ३. | परिणीता—शरच्चंद्र चटोपाध्याय ... | ०-१२-० |
| ४. | लपलेले खडक—सहस्रबुद्धे. ... | ०-४-० |
| ५. | सत्याचे वाली नाटक ... | १-०-० |
| ६. | कुमारिकेची हांक—हडप. ... | १-०-० |
| ७. | माझे उच्छ्वास ! ... | १-०-० |

**महाराष्ट्र पब्लिशिंग हौस, लिमिटेड, पुणें.**

१२ बुधवार, पुणें २.